कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. २१ मार्च २०२४
किंमत ४ ₹

## शिवतारे बारामतीतून लढणारच

**पुणे :** बारामती मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवण्यावर शिंदे यांच्या शिवसेनेतील नेते विजय शिवतारे ठाम आहेत. त्यांचा बंडखोरीचा पवित्रा हा बारामतीत महायुतीसाठी चांगलीच डोकेदुखी ठरतोय. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विजय शिवतारेंची समजूत काढण्याचा याआधी प्रयत्न केलेला आहे. मात्र विजय शिवतारे निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. शिवतारे यांनी कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवणार असल्याचे म्हणत थेट विजयाचे गणित सांगितले आहे.

## क्रिकेटपटूला अलिबाची भूरळ



**अलिबाग :** अलिबागचे आकर्षण क्रिकेट जगतापासून ते फिल्म इंडस्ट्रीत कायम आहे. अनेकांना अलिबागची कायम भुरळ पडली आहे. यात अजून एका क्रिकेटपटूची भर पडली आहे. रणजी पटू, आयपीएल तसेच गोवा क्रिकेटकडून प्रतिनिधित्व करणारा तसेच समालोचक असणारा सिद्धेश लाड याने अलिबाग पान २ वर

उन्हाळ्याची सुट्टी
AI शी गट्टी
चला करूया MS-CIT!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

**आजचा अग्रलेख**
विकास म्हणजे काय?

**वे|ध|क**

### आक्षी-साखरच्या दहा बोटींवर कारवाई

**आगरदांडा:** एलईडी व पर्सनेट मासेमारी करण्यावर बंदी असताना सुद्धा कोणालाही न जुमानता कायदा धाब्यावर बसून अलिबाग तालुक्यातील आक्षी साखर येथील काही मच्छिमार खोल समुद्रात मासेमारी करताना कोस्टगार्डने रंगेहाथ पकडले आहे. मुरुड पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले कि, कोस्टगार्ड टेहाळणी करीत असताना खोल समुद्रात या बोटी पकडण्यात आल्या आहेत.यामध्ये १० बोटींचा समावेश आहे. या सर्व बोटी पकडून आगरदांडा बंदरात आणल्या आहेत.याबाबत अधिक माहिती देताना मुरुड तालुक्याचे मत्स्यविकास व परवाना अधिकारी तुषार वाळुंज यांनी सांगितले कि,दहा बोटीवरील १०३ खलाश्यांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

### सद्‌गुरू जग्गी वासुदेव यांच्यावर शस्त्रक्रिया

**नवी दिल्ली :** अध्यात्मिक गुरू आणि ईशा फाऊंडेशनचे संस्थापक सद्‌गुरु जग्गी वासुदेव यांच्यावर दिल्लीतील खासगी रुग्णालयात ब्रेन सर्जरी करण्यात आली आहे. सद्‌गुरू जग्गी वासुदेव यांची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती आहे. सद्‌गुरू जग्गी वासुदेव यांनी सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती दिली आहे. मेंदूला मोठी सूज आणि रक्तस्त्राव झाल्यानंतर दिल्लीतील अपोलो हॉस्पिटलमध्ये आपत्कालीन मेंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सद्‌गुरु जग्गी वासुदेव यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखीचा त्रास सुरु होता.

### गडकरींविरोधात विकास ठाकरे मैदानात

**नागपूर :** नागपूर लोकसभेसाठी नितीन गडकरी यांच्याविरोधात काँग्रेसकडून विकास ठाकरे यांना उमेदवारी मिळाली आहे. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांच्या हस्तक्षेपानंतर दिल्ली येथे झालेल्या काँग्रेस समितीच्या बैठकीमध्ये नागपूर लोकसभेसाठी आमदार विकास ठाकरे यांच्या नावावर शिक्कमोर्तब झाले आहे. मात्र याची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. नागपूरच्या ज्येष्ठ नेत्यांनी मैदानात उतरायला हवे होते, असे म्हणत विकास ठाकरे यांनी नाव न घेता नितीन राऊत, विलास मुत्तेमवार आणि सतीश चतुर्वेदी यांच्याकडे बोट दाखवले आहे.

# चवदार तळ्यावर भीमसागर



**। महाड / अलिबाग । प्रतिनिधी ।**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडच्या चवदार तळ्यावर मानवी मूल्यांसाठी सत्याग्रह करून सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले. त्या ऐतिहासिक घटनेचा ९७ वा वर्धापन दिन बुधवारी (दि.२०) महाडमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भीमसैनिकांच्या ''जय भीम'च्या जयघोषांनी संपूर्ण महाड दुमदुमून गेले होते. गेल्या दोन दिवसांपासून चवदार तळे व क्रांतीभूमी परिसराला अक्षरश: जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

### मनुवादाला तोंड देण्यासाठी एक व्हा;आनंदराज आंबेडकर यांचे आवाहन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्यावर पिण्याच्या पाण्यासाठी सामाजिक क्रांती केली. गेली अनेक वर्ष चवदार तळे स्मृतीदिनाचा वर्धापन दिन महाडमध्ये साजरा केला जात आहे. विविध संघटना, धार्मिक संघटना, सामाजिक संस्था आणि राजकीय पक्षांच्या वतीने विविध सभा आणि मिरवणुकीचे आयोजन केले जाते. १९ आणि २० मार्च या दोन दिवशी विविध कार्यक्रम आयोजित केले जाते. चवदार तळे येथे आज पहाटेपासूनच भीमसैनिकांनी अभिवादन करण्यासाठी सकाळी नऊ वाजता शासनाच्या वतीने पोलीस मानवंदनादेखील देण्यात आली.

यावेळी बौद्धजन पंचायत समिती, भारिप बहुजन महासंघ, पीपल्स रिपब्लिकन पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, कोकण रिपब्लिकन संघटना, भारत मुक्ती मोर्चा, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष, आदी सामाजिक राजकीय आणि धार्मिक संघटनांनी अभिवादन सभांचे आयोजन केले होते. यापैकी बौद्धजन पंचायत समितीचे आनंदराज आंबेडकर यांनी मार्गदर्शन करताना सत्ताधाऱ्यांना टिकेचे लक्ष केले. संपूर्ण देशभरामध्ये पुन्हा मनूवाद निर्माण केला जात असून आपण सगळे शांत बसलो आहोत. आपण सगळ्यांनी एक होणे आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. देशात बाबासाहेबांच्या क्रांतीमुळे आपले सोने झाले पण मनुस्मृतीने काय होईल याचा विचार करा. हे थांबवायचं असेल तर एक व्हा आणि दिशाभूल करणाऱ्यांपासून सावध व्हा असे आवाहनदेखील केले. पान २ वर

### ‘संविधान बदल नाही, कायद्यांची दुरुस्ती’

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिल्लीत अमित शहा यांची भेट घेतली. हि भेट राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा एनडीएमधील प्रवेशासाठी नव्हती . राज ठाकरे यांच्या एनडीएतील सहभागाने आगामी निवडणुकांसाठी फार मोठा फायदा होणार नाही. मात्र या संदर्भात महायुतीचे सर्वोच्च नेते योग्य निर्णय घेतील.



काही महिन्यापासून संविधानामध्ये भाजपाकडून बदल करण्याबाबत केले जाणारे वक्तव्य हे दुर्दैवी आहे.संविधान कोणीही बदलू शकत नाही मात्र त्यामधील असणाऱ्या काही कायद्यांची दुरुस्ती केली जाऊ शकते, असे रामदास आठवले म्हणाले.

चवदार तळे सत्याग्रहाच्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय मंत्री रामदास आठवले महाड येथे आले होते. त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चवदार तळे येथे जाऊन अभिवादन केले. त्यानंतर माध्यमांबरोबर मोठे विसावा येथे संवाद साधताना त्यांनी विविध विषयांसंदर्भात आपली स्पष्ट मते व्यक्त केली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न पान २ वर

# अटल सेतूवर महिलेची आत्महत्या

**। उरण । वार्ताहर ।**



शिवडी-न्हावा सिलिंकवर रविवारी (दि.१७) एका डॉक्टर महिलेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. डॉ. किंजल शहा या महिलेने समुद्रात उडी घेत आपले जीवन संपवले.

न्हावा शेवा पोलिसांकडून त्यांच्या मृतदेहाचा शोध घेण्यात येत आहे. मात्र, अटल सेतूवरुन आत्महत्येचा प्रकार घडल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

डॉ. किंजल शहा (वय ४३) या डॉक्टर आहेत. परंतु गेल्या दहा वर्षांपासून त्या नैराश्यात होत्या. नैराश्यातूनच त्यांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे बोलले जात आहे. डॉ. किंजल शहा या दादरच्या नवीन आशा इमारतीत त्यांच्या कुटुंबियांसह राहत होत्या. बाहेर काम आहे, असे सांगून त्या रविवारी सकाळी घरातून निघाल्या. त्या घरी परतल्या नसल्याने वडिलांनी शोध सुरू केला. त्यावेळी किंजल यांनी लिहून ठेवलेली सुसाईड नोट वडिलांना सापडली. अटल सेतूवर टॅक्सीने आत्महत्या करण्यासाठी जात असून टॅक्सी चालकास त्रास देऊ नये, असे त्यांनी त्या चिठ्ठीत लिहिलेले होते. त्यांच्या वडिलांनी पान २ वर

> **डॉ. किंजल शहा एका टॅक्सीमधून अटल सेतूवरून प्रवास करत होत्या. त्यांनी चालकाला पुन्हा टॅक्सी मुंबईच्या दिशेने वळवायला सांगितली. तिने सांगितल्यानुसार त्याने टॅक्सी माघारी वळवली. त्यानंतर डॉ. किंजल यांनी टॅक्सी बाजूला थांबवण्यास सांगितली. मात्र टॅक्सी चालकाने नकार दिला. अखेर डॉ. किंजलने त्याला टॅक्सी थांबवण्यास भाग पाडले. त्यानंतर त्यांनी संधी साधत समुद्रात उडी घेतली. घटनेत टॅक्सी चालकाचा कोणत्याही प्रकारचा दोष नसल्याचे सापडलेल्या सुसाइट नोटमधून दिसत असले तरी पोलीस यंत्रणा महिलेचा शोध घेत आहे.**
>
> – राजेंद्र कोते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, न्हावा-शेवा

# महाविद्यालयाच्या बसला अपघात

## एकाचा मृत्यू, ४५ विद्यार्थ्यांसह शिक्षक सुखरूप

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील शिळफाटा-मिळगावच्या तीव्र उतारावर बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील अनुराधा इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या बसचा ब्रेक फेल झाल्याने अपघात घडला. भरधाव वेगात येणाऱ्या बसची रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या दगडाला धडक बसली. या अपघातात बसमधील एकाचा जागीच मृत्यू झाला तर ४५ विद्यार्थ्यांसह शिक्षक सुखरूप बचावले.



अनुराधा इंजिनिअरिंग कॉलेज खामगाव यांची शैक्षणिक सहल खासगी बसने चिखली ते रायगडकडे निघाली होती. या बसमध्ये ४५ विद्यार्थी आणि शिक्षक सहलीसाठी निघाले होते. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खोपोली एक्झिटवरून ही बस शिळफाट्याकडे जात असताना मिळगावजवळील तीव्र उतारावर या बसचा ब्रेक फेल झाला. यामुळे बस चालकाचा वेगावरील ताबा सुटला. तरीदेखील बस चालकाने प्रसंगावधान राखत रस्त्याच्या बाजूला १०० मीटर खाली जाऊन दगडाला बसची धडक दिली. यामुळे बसला अपघात घडला.

या अपघातात बसमधील जेवण बनवणारा राहुल साहेबराव सूरूशे (वय ३०, रा.कोल्हारा चिखली) याचा बसच्या पान २ वर

# अब की बार भाजप तडीपार

**। सिंदखेडराजा । प्रतिनिधी ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उघडपणे गुजरातबद्धल विशेष ममत्व दाखवून राज्याराज्यांत शत्रुत्वाच्या भिंती उभ्या करीत आहेत. भाजपच्या अब की बार चारसो पार घोषणेची खिल्ली उडवून उद्धव ठाकरे यांनी अब की बार भाजप तडीपार असा नारा दिला. देशात निरंकुश हुकूमशाही आणू इच्छिणाऱ्या भाजपचे मनसुबे लोकसभा निवडणुकीत उध्वस्त करून महाराष्ट्रातील गद्दारांना त्यांची जागा दाखवा, असे आवाहनही त्यांनी केले. सिंदखेडराजा येथे बुधवारी (दि.१९) रणरणत्या उन्हात जनसंवाद सभा पार पडली.

यावेळी जिजामातेच्या माहेरातून उद्धव ठाकरे यांनी

- **मोदी, शहांमध्ये औरंगजेबी वृत्ती**
- **उद्धव ठाकरेंचा घणाघात, यंदा देशात परिवर्तन अटळ**

लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खा.संजय राऊत, आ.नितीन देशमुख, जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना केवळ आणि केवळ गुजरातबद्दल ममत्व का? आताही सेमिकंडक्टरचे देशात येऊ घातलेले दोन प्रकल्प पुन्हा गुजरातला नेले आहेत. भाजप



म्हणजे भाडोत्री जनता पार्टी आहे. जनतेने देशावरील हुकूमशाहीचा धोका वेळीच ओळखून अशा प्रवृत्तीला ठेचणे काळाची गरज आहे. जनता हे करणारच असून यंदा देशात परिवर्तन अटळ असल्याचे भाकितही ठाकरे यांनी केले.

शिवरायांच्या राज्यात अजूनही गद्दारांना थारा नाही, हे जनता दाखवून देणार ही काळ्या दगडावरची रेष आहे. महाराष्ट्रात शिवरायांचा जन्म झाला. औरंगजेबचा जन्म गुजरातमधील दाहोद येथे झाल्याचे सांगून यामुळे मोदी, शहा यांच्यात औरंगजेबी वृत्ती आहे. पान २ वर

## लोकसभेसाठी पहिला अर्ज

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीचं बिगुल आता वाजलं आहे. पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी आजपासून अर्ज भरण्यास सुरुवात झालीआहे.यापार्श्वभूमीवरआजच्या पहिल्याच दिवशी श्री व्यंकटेश्वर स्वामी यांनी नागपूरमधून लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून पहिला अर्ज भरला आहे.

स्वामी हे भाजपचे समर्थक असून त्यांनी नागपूर लोकसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला आहे. या ठिकाणी भाजपने नितीन गडकरी यांना उमेदवारी दिली आहे. तरी देखील व्यंकटेश स्वामी यांनी भाजपचा पूरक उमेदवार म्हणून आपला अर्ज दाखल केला आहे. पान २ वर

## युतीसोबत मनसेची सेटिंग

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मनसेचे नेते राज ठाकरे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर मनसे महायुतीत सामील होणार असल्याची अटकळ बांधली जात आहे. या बैठकीतील तपशील अद्याप दोन्ही पक्षांनी जाहीर केला नसला तरी इतर पक्षांच्या नेत्यांनी त्यावर भाष्य केलं आहे. राज ठाकरे मुंबईत परतल्यानंतर मनसेचे ज्येष्ठ नेते बाळा नांदगावकर यांनी राज ठाकरेंची भेट घेतली. तसेच माध्यमांशी बोलताना त्यांनी माहिती दिली की, राज ठाकरे अमित शाहांच्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून येत्या २-४ दिवसांत निर्णय जाहीर केला जाईल. मात्र मनसेच्या या भूमिकेवर शिवसेना उबाठा गटाचे नेते आणि पान २ वर

### नारायण राणेंच्या पराभवाची हॅटट्रिक?

**माझ्या मतदारसंघात खुद्द पंतप्रधान येऊन प्रचार सभा घेणार आहेत, याचा मला आनंद वाटतो. एवढं करूनही भाजपाच्या उमेदवाराचा पराभव होणार आहे. नारायण राणेंना जर याठिकाणाहून उभे केले तर त्यांच्या पराभवाची हॅटट्रिक होईल, असेही खासदार विनायक राऊत म्हणाले.**

## सर्व पक्षीयांना धाकधूक

**। छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीपूर्वी आंतरवली सराटी येथे मनोज जरांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या रविवारी (दि.२४) होणाऱ्या बैठकीकडे सर्वपक्षीय नेत्यांचे लक्ष लागले आहे. आरक्षण मिळविण्यासाठी सुरू असणाऱ्या आंदोलनाचा सूर भाजपविरोधी होतो का? तसे झाल्यास निवडणुकीमध्ये अधिक संख्येने उमेदवार उभे करायचे का? यासह अनेक विषयांवर चर्चा होऊन त्यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.

२४ तारखेच्या निर्णयाच्या आधारे मराठा पान २ वर




## इन्फोसिसचे प्रमुख नारायण मुर्तींनी दिले १५ लाख शेअर

# चार महिन्यांचा चिमुकला बनला करोडपती

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशातील दुसरी सर्वात मोठी आयटी कंपनी असलेल्या कंपनीचे प्रमुख नारायण मुर्ती यांच्या नातवाच्या नावावर १५ लाख शेअर्स आहेत. या शेअर्सची किंमत २४० कोटी रुपये आहे. यामुळं नारायण मुर्ती यांचा नातू जगातील सर्वात तरुण करोडपती झाला आहे.



एका ४ महिन्यांच्या बाळाच्या नावावर १५ लाख शेअर्स आहेत. कंपनीचे प्रमुख नारायण मुर्तींचा मुलगा रोहन मुर्ती यांचा मुलगा एकाग्र मुर्ती याच्या नावावर कंपनीचे १५ लाख शेअर्स आहेत. या शेअर्सची किंमती २४० कोटी रुपये आहे. त्यामुळं नारायण मूर्ती यांचा नातू देशातील सर्वात तरुण करोडपती बनला आहे. कंपनीने एकाग्र मूर्तीच्या नावावर १५ लाख शेअर्स केले आहेत. यामुळं एकाग्र मुर्ती हा घरातील लहान सदस्य कंपनीचा हिस्सेदार झाला आहे. त्याचा या कंपनीत ०.०४ टक्के हिस्सा झाला आहे.

**सुधा मूर्ती यांचा ०.९३ टक्के हिस्सा**

दरम्यान, कंपनीचा ०.०४ टक्के हिस्सा एकाग्र मूर्तीच्या नावावर केल्यानंतर नारायण मूर्ती यांच्याकडे ०.३६ टक्के हिस्सा शिल्लक आहे. त्यांच्याकडे कंपनीचे अद्याप १.५१ कोटी शेअर्स शिल्लक आहेत.

### अक्षताची १.०५ टक्के हिस्सेदारी

**नारायण मूर्ती आणि सुधा मुर्ती यांची मुलगी अक्षता मुर्ती यांच्या नावावर देखील इन्फोसिसमध्ये मोठी हिस्सेदारी आहे. त्यांची या कंपनीत १.०५ टक्के हिस्सेदारी आहे. म्हणजे त्यांच्या नावावर कंपनीचे ३८९५७०९६ शेअर्स आहेत. महत्वाचं म्हणजे अक्षता मुर्ती या ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या पत्नी आहेत.**

नारायण मूर्ती यांच्या पत्नी सुधा मूर्ती यांचा इन्फोसिसमध्ये ०.९३ टक्के हिस्सा आहे. सुधा मूर्ती यांच्याकडे ३,४५,५०,६२६ इन्फोसिस स्टॉक्स आहेत.

### रोहन मुर्ती यांची मोठी हिस्सेदारी

**नारायण मूर्ती आणि सुधा मुर्ती यांचा मुलगा रोहन मुर्ती यांची कंपनीत सर्वात मोठी हिस्सेदारी आहे. रोहन यांची कंपनीत १.६४ टक्के हिस्सेदारी आहे. त्याच्याजवळ कंपनीचे ६,०८,१२, ८९२ शेअर्स आहेत. सध्या रोहन मुर्ती हे लंडनमध्ये राहत आहेत.**

देशातील बड्या उद्योगपतीपैंकी त्या एक आहेत. नुकतीचं त्यांनी राजकीय क्षेत्रात देखील पदार्पण केले आहे. त्यांना राज्यसभेवर पाठवण्यात आले आहे.

# युवा,महिला मतदार ठरवणार रायगडचा खासदार

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**लोकसभा मतदार संघामध्ये तब्बल १६ लाख ५३ हजार ९३५ मतदारांचा समावेश आहे. यातील विशेष बाब म्हणजे १८-१९ वयोगटातील १६ हजार २८८ मतदार हे प्रथमच १७ व्या लोकसभेसाठी आपल्या मतदानाचा हक्क बजावण्यास इच्छुक आहेत. त्यामध्ये आठ हजार ९२० युवकांचा तर, सात हजार ३६८ युवतींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे आठ लाख ४० हजार ४१६ महिला मतदार आहेत. हेच मतदार रायगडचा खासदार ठरवणार आहेत.**

लोकसभेच्या निवडणुका शनिवारी जाहीर झाल्या आहेत. विविध राजकीय पक्षांनी मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासन देखील कामाला लागले आहे. तसे बघायला गेले, तर निवडणूक विभागाचे काम हे सातत्याने सुरुच असते. लोकसभेच्या निवडणूक पार पडल्यानंतर, विधानसभा, महापालिका, नगर पालिका/परिषद, ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यामुळे निवडणूक विभागाचे काम हे निरंतर सुरुच



**■ १६ हजार नव मतदार, आठ लाख महिला मतदारांचा समावेश**

असते. २००९ साली देशातील सर्व मतदार संघांची पुनर्रचना झाली होती. कुलाबा मतदार संघ बाद होऊन त्यांची जागा रायगड लोकसभा मतदार संघानी घेतली. रायगड लोकसभा मतदार संघाला रत्नागिरी जिल्ह्याचा काही भाग जोडण्यात आला. त्यामध्ये अलिबाग, पेण, श्रीवर्धन, महाड या रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघाचा समावेश होतो. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर आणि दोपोली विधानसभा अशा एकूण सहा मतदार संघाचा समावेश करण्यात आला.

### ३२-रायगड लोकसभा मतदार संघ मतदार

| विधानसभा | पुरुष | स्त्री | अन्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| पेण | १५२०१३ | १४९४१३ | ०१ | ३०१४२७ |
| अलिबाग | १५५५२४ | १४८३०८ | ०० | २९३८३२ |
| श्रीवर्धन | १२७५४९ | १३२२७२ | ०१ | २५९८२२ |
| महाड | १४०७०१ | १४१०१८ | ०२ | २८१७२१ |
| दापोली | १३३३९३ | १४४२७९ | ०० | २७७६७२ |
| गुहागर | ११४३३५ | १२१५२६ | ०० | २३९४६१ |
| **एकूण** | **८१३५१५** | **८४०४१६** | **०४** | **१६५३९३५** |

### १८-१९ मतदार (२३ जानेवारी २०२४)

| विधानसभा | पुरुष | स्त्री | अन्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| पेण | २१७६ | १७२४ | ०० | ३९०० |
| अलिबाग | १८९६ | १४९८ | ०० | ३३९४ |
| श्रीवर्धन | ११२१ | ८४९ | ०० | १९७० |
| महाड | ११३७ | ९३५ | ०० | २०७२ |
| दापोली | १२९९ | १२०० | ०० | २४९९ |
| गुहागर | १२९१ | ११६२ | ०० | २४५३ |
| **एकूण** | ८९२० | ७३६८ | ०० | १६२८८ |

# आचारसंहितेचे काटेकोर पालन करा : तहसीलदार

**। म्हसळा । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीची यंत्रणा पूर्णपणे तयार आहे. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटबाबत कोणताही संभ्रम नाही. अजूनही मतदार नावे नोंद करू शकता. मतदारांनी मतदार यादीतील नावे तपासावीत. आचारसंहिता भंग होईल असे कोणतेही कृती करू नका. निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करा. परवानगी घेऊनच काम करा, असे आवाहन म्हसळा तहसीलदार समीर घारे यांनी केले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समीर घारे यांनी तहसील कार्यालयात सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन त्यांना निवडणूक कामकाजाविषयी माहिती दिली. राजकीय पक्षांनीही यासाठी मदत करण्याचे त्यांनी आवाहन केले आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक जगदीश दत्तात्रेय देशमुख यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ९ | ३ | ०-५३-१० | १-३१ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.२१/०३/२०२४
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, कर्जत, रायगड


## पान १ वरून

## चवदार तळ्यावर भीमसागर

चवदार तळे सत्याग्रह स्मृतिदिनासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून भीमसैनिक मोठ्या प्रमाणावर दाखल झाले होते. विविध संघटनांनी काढलेल्या मिरवणुका आणि भीमज्योतीने संपूर्ण चवदार तळे परिसर भीम जयघोषाने दुमदुमून गेले. आलेल्या भीमसैनिकांनी आंबेडकर अनुयायांनी चवदार तळ्याचे पाणी ओंजळीत घेऊन प्राशन केले. शाहीर जलसा आणि आंबेडकरी गीतांनी चवदार तळ्यावर चैतन्य निर्माण झाले होते. भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने महाडमध्ये घेण्यात आलेल्या श्रामणेर शिबिराचा समारोप यावेळी करण्यात आला. यावेळी सर्व प्रशिक्षणार्थी भंतेंनी शहरातून 'सबका मंगल होय रे' म्हणत संचलन केले. समता सैनिक दलाच्या वतीने देखील महाड शहरातून शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणूक काढून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर संचलन करत अभिवादन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे देखील शासनाच्या मध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी शाहिरी कार्यक्रम आणि आंबेडकरी गीतांचा आनंद घेता आला.यावर्षी आचारसंहिता असल्याने राजकीय बॅनरबाजी मात्र झाली नसली तरी काही ठिकाणी कमानी दिसून येत होत्या. महाड नगरपरिषदेने सालाबादप्रमाणे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आंबेडकरी अनुयायांसाठी मंडप, तर अनेक सामाजिक संस्थांनी भोजन आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे पोलीस प्रशासनाच्या वतीने बंदोबस्त ठेवण्यात आला होता. महाड शहराच्या सर्व प्रवेशद्वारांच्या बाजूलाच वाहन पार्किंग सुविधा केल्यामुळे शहरांमधील वाहतूक कोंडीची समस्या काही अंशी कमी झाली.

## 'संविधान बदल नाही, कायद्यांची दुरुस्ती'

साकार करण्याकरिता संघर्ष सुरूच ठेवणार असल्याचेही केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.

राज्यातील राष्ट्रवादी व शिवसेना पक्षफुटीसंदर्भात संबंधित दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेतेच कारणीभूत आहेत. त्यांना आपल्या पक्षाचे आमदार सांभाळता आले नाहीत. तसेच त्यांच्यातील असलेल्या विविध समस्या पूर्ण करता आल्या नाहीत. यामुळेच दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी ४० आमदारांना बरोबर घेऊन लोकशाही मार्गाने ते एनडीएमध्ये दाखल झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाची निर्मिती करताना दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. देशातील जातीव्यवस्था संपवावी, अखंड व मजबूत भारत जगासमोर उभारावा व देश कल्याणासाठी सर्वांनी सबका साथ सबका विकास अशी देशाची प्रगती अधिक वेगाने होत आहे. गेल्या ७० वर्षाच्या काळात काँग्रेसकडून विकासाकडे दुर्लक्ष झाले. म्हणूनच आपल्या सहकाऱ्यांच्या केलेल्या सूचनेनंतर आपण दहा वर्षांपूर्वी युतीमध्ये सहभागी झालो. राज्यात लोकसभेसाठी आपण दोन जागांची म ागणी केली असून त्या भाजपकडून मिळाव्यात, अशी अपेक्षा आहे. मात्र यावर अद्याप निर्णय झाला नसल्याचेही आठवले यांनी सांगितले.

## अटल सेतूवर महिलेची आत्महत्या

तात्काळ भोईवाडा पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. भोईवाडा पोलिसांनी सीसीटीव्ही तपासले असता डॉ. किंजल या दुपारी शिंदेवाडी येथून एका टॅक्सीमधून अटल सेतूवर गेल्याचे निष्पन्न झाले. किंजल यांनी टॅक्सी अटल सेतूवर नेल्यानंतर त्यांनी चालकाला पुन्हा टॅक्सी मुंबईच्या दिशेने वळविण्यास सांगितली. त्यानुसार चालकाने टॅक्सी पुन्हा माघारी वळविल्यानंतर किंजल यांनी टॅक्सी बाजूला थांबविण्यास सांगितली, पण चालकाने टॅक्सी थांबविली नाही. अखेर चालकाला टॅक्सी थांबविण्यास भाग पाडून किंजल यांनी संधी साधत समुद्रात उडी टाकली. या झालेल्या घटनेचे गांभीर्य ओळखून टॅक्सी चालकाने पोलिसांना याबाबत माहिती दिली. मात्र सोमवारी संध्याकाळी उशिरा भोईवाडा पोलिसांनी न्हावा-शेवा पोलिसांशी संपर्क साधल्यानंतर महिलेची ओळख पटली.

## अब की बार भाजप तडीपार

त्यांना महाराष्ट्र लुटायचा आहे. मुंबई विकायची आहे अन् मराठी माणूस संपावायचा आहे. मात्र, या कारस्थानात बाळासाहेबांची शिवसेना, उद्धव ठाकरे आड येतात. त्यामुळे त्यांनी सेनेचे दोन तुकडे केले. यामुळे समाधान न झाल्याने राष्ट्रवादी फोडली, काँगेसचे चव्हाण यांना घेऊन गेले. ते कचऱ्याची गाडी घेऊन फिरताहेत, इकडून तिकडून कचरा जमा करताहेत. मात्र, त्याचा काडीमात्र फायदा होणार नसल्याचे टोलाही ठाकरे यांनी लगावला.

तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना कचऱ्याची टोपली दाखवीत असताना केवळ बाळासाहेब ठाकरे त्यांच्या बाजूने उभे ठाकल्याने ते बचावले. मात्र, आज ते त्याच शिवसेनेला संपवायचा प्रयत्न करताहेत. मात्र मर्द मावळ्यांची, वाघांची सेना सहजासहजी संपणार नाही, असा विश्वास ठाकरे यांनी बोलून दाखविला. ईडी, सीबीआय, आयकर हे आता त्यांच्यासाठी भाई मंडळी झाली आहे. ते भाईपण आहेत अन घरगडी सुद्धा असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी यावेळी केली.

## लोकसभेसाठी पहिला अर्ज

व्यंकटेश्वर स्वामी यांनी आपण सोलापुरातून राखीव मतदारसंघातूनही लोकसभा उमेदवार म्हणून अर्ज भरणार असल्याचं माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितलं. त्यांनी म्हटलं की, गडकरींसोबत मी पूरक उमेदवार राहणार आहे. गडकरींशी माझं काही बोलणं झालेलं नाही पण ते आमचे मोठे नेते आहेत. मला देशासाठी काम करायचं आहे, त्यामुळे मला त्यांच्याशी बोलत बसून काही उपयोग नाही. देशाला त्यांनी तयार केलेले रस्ते दिसत आहेत. त्यांच्याच रोडवरुन मी येतो-जातो आहे. मी गडकरींना मत मिळावे, यासाठी आवाहन करणार आहे. मी सोलापुरातून राखीव जागेतून लोकसभा मतदारसंघातून लढणार आहे, असंही यावेळी व्यंकटेश्वर स्वामी यांनी सांगितले.

## महाविद्यालयाच्या बसला अपघात

केबिनमध्ये अडकून मृत्यू झाला. अन्य बसमधील ४५ विद्यार्थांना कुठल्याही प्रकारची दुखापत झाली नाही. या अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस आणि अपघातग्रस्त पथकाचे सदस्य घटनास्थळी दाखल होत बसमधील विद्यार्थी आणि शिक्षकांना तात्काळ बाहेर काढून त्यांना गगनगिरी आश्रम मठ खोपोली येथे राहण्याची सोय करण्यात आली आहे.

## युतीसोबत मनसेची सेटिंग

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभेचे खासदार विनायक राऊत यांनी टीका केली आहे.

निवडणूक आली की, मनसेची कुणाबरोबर तरी सेंटिग चालत असते. स्वतःच्या पक्षाचा खासदार, आमदार, नगरसेवक, जिल्हापरिषद सदस्य निवडून आणण्याची इच्छा मनसेच्या प्रमुखाकडे आहे, असे कधीही दिसलं नाही. केवळ उद्धव ठाकरेंच्या द्वेषापोटी आणि त्यांना टक्कर देण्यासाठी कुठल्या तरी पक्षाशी हातमिळवणी करायची, हाच धंदा आतापर्यंत मनसेनी केला आहे. यावेळी त्याची पुनरावृत्ती होत असली तरी लोक त्याला पाठिंबा देणार नाहीत. त्यांचं या निवडणुकीत पानीपत झाल्याशिवाय राहणार नाही, अशी प्रतिक्रिया शिवसेना उबाठा गटाचे खासदार विनायक राऊत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

मनसेने भाजपाबरोबर युती केली असली तरी काहीही दुःख वाटत नाही. पण मनसेच्या पदाधिकाऱ्यांना मात्र निश्चितच वाईट वाटतं. पक्षप्रमुख चुकीचं करत असल्याची भावना मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. भाजपा पक्षाचाही आता स्वतःच्या नेतृत्वावर विश्वास राहिलेला नाही. त्यांचा नरेंद्र मोदींच्या गॅरंटीवरचा विश्वास उडालेला असल्यामुळेच इकडच्या तिकडच्यांना गोळा करुन आपली पोळी भाजपण्याचा प्रयत्न केला जात आहे, असेही विनायक राऊत म्हणाले.

महाविकास आघाडीच्या तीनही पक्षांमध्ये सुसंवाद आहे. राज्यातील ४८ मतदारसंघातील बहुसंख्या जागांवर एकमत झाले आहे. लवकरच उर्वरित जागांवर समन्वयातून मार्ग निघेल आणि प्रचारालादेखील सुरुवात होईल. लोकसभा निवडणुकीत मविआ आघाडीला चांगलं यश मिळेल, अशी भूमिकाही विनायक राऊत यांनी व्यक्त केली. तसेच मविआ आघाडीत प्रकाश आंबेडकर यावेत, अशी तीनही पक्षांची अपेक्षा आहे. यासाठी आंबेडकर यांचा सन्मान होईल, अशा जागा देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## सर्व पक्षीयांना धाकधूक

मतपेढीला काय दिशा मिळेल, यावर राजकीय समीकरणे बदलणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या दिवशी होळीचा सण आहे. आरक्षणाच्या निमित्ताने मराठा समाजाच्या एकत्रिकरणाचा लाभ होऊ शकतो का? याची चाचपणी बीड लोकसभा मतदारसंघात शरद पवार गटाकडून सुरू आहे.

जरांगे यांनी १० टक्के आरक्षण नाकारुन ओबीसीमधूनच आरक्षण देण्यासाठी सगेसोयरेची मागणी लाऊन धरली आहे. त्यामुळे सत्ताधारी गटात जरांगे यांच्या निवडणूक विषयक भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजप व शिवसेनेमध्ये मराठा मतपेढीवरुन चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरची जागा कोणाला द्यायची, याचा तिढा सुटलेला नाही. मराठा आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा देणारे विनोद पाटीलही निवडणुकीसाठी इच्छुक असून शिंदेगटाकडून उमेदवारी मिळावी, असे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे सर्व मंडळीमध्ये २४ मार्च रोजी होणाऱ्या बैठकीबाबत उत्सुकता आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि हिंगोली या मतदारसंघावर मराठा मतपेढीचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या मतदारसंघातील नेत्यांमध्ये २४ मार्चला काय होणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचलेली आहे. या अनुषंगाने आंतरवली सराटीमधील मराठा आरक्षण आंदोलनात सहभागी असणारे प्रदीप सोळंके म्हणाले, निवडणुकीमध्ये प्रत्यक्ष सहभाग घ्यायचा की नाही, मोठ्या संख्येने उमेदवार उभे करायचे की नाही, याचा निर्णय मनोज जरांगे हेच घेतील. बीड जिल्ह्यात पंकजा मुंडे यांच्या उमेदवारीलाही मराठा मतपेढीमुळे आव्हान उभे राहू शकते.

## क्रिकेटपटूला अलिबाची भूरळ

तालुक्यातील आक्षी येथे दहा गुंठे जागा खरेदी केली आहे. अलिबाग दुय्यम निबंधक कार्यालयात सिद्धेश याने बुधवारी आपल्या मालमत्तेची नोंदणी केली आहे. ॲड महेश म्हात्रे यांनी सिद्धेश याच्या मालमत्तेबाबत व्यवहार केला आहे. अलिबाग तालुका हा निसर्गाने नटलेला आहे. त्यामुळे अनेकांना अलिबागच्या सौंदर्याची भुरळ पडलेली असते. उद्योजक, राजकारणी, अभिनेते यासह आघाडीचे क्रिकेटर हे अलिबागकर झाले आहेत. सचिन तेंडुलकर, अजित आगरकर, रोहित शर्मा, विराट कोहली, रवी शास्त्री, दिनेश कार्तिक या क्रिकेटर यांनी अलिबाग मध्ये मालमत्ता घेतलेली आहे. त्यामुळे अलिबागमध्ये आघाडीचे क्रिकेटर हे अलिबागकर बनले आहेत. तर अनेक क्रिकेटर भविष्यात अलिबागकर होण्याच्या मार्गावर आहेत.

रणजी, आयपीएल खेळणारा आघाडीचा क्रिकेटर सिद्धेश हा सुध्दा आता अलिबागकर झाला आहे. मुंबई इंडियन्स, कोलकत्तामधून सिद्धेश हा आयपीएल खेळला आहे. फलंदाज आणि बॉलिंग असे दोन्हीमध्ये सिद्धेश हा उत्तम खेळाडू आहे. मुंबई संघाचा रणजीचा कप्तान ही सिद्धेश राहिलेला आहे. सध्या तो गोवा क्रिकेटतर्फे खेळत आहे. अलिबाग तालुक्यातील नारळी पोफळीच्या बागा असलेल्या आक्षी गावात सिद्धेश याने दहा गुंठ्याची बागायती मालमत्ता खरेदी केली आहे. यामध्ये छोटे घरही आहे. अलिबाग दुय्यम निबंधक कार्यालयात येऊन सिद्धेश याने नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली आहे. लवकरच तो येथे आपले घर बांधून आराम करण्यासाठी येणार आहे.

# उमेदवारांच्या शक्तीप्रदर्शनावर निर्बंध

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

उमेदवारी अर्ज दाखल करताना आता पाच व्यक्तींनाच परवानगी देण्यात आली आहे. तसेच तीन पेक्षा अधिक वाहने उमेदवारांना आणता येणार नाही. त्याचप्रमाणे कार्यालयाच्या परिसरात करण्यात येणाऱ्या शक्ती प्रदर्शनावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

***आंदोलन, मोर्चा, उपोषणांवर बंदी***

***सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत असल्याबाबतचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी लागू केले आहेत.***

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूकसाठी १६ मार्च रोजी कार्यक्रम घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. जिल्हादंडाधिकारी जावळे यांनी कलम १४४ अन्वये १६ मार्च ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (६ जून २०२४ पर्यंत) प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

त्यानुसार निवडणुकीच्या कालावधीत जिल्ह्यात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करताना वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त वाहनांचा समावेश नसावा. तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या दालनात पाच व्यक्तींव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. याशिवाय कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे आदेश लागू केले आहेत.


**जाहीर सूचना**

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये शैलजा वसंत पाटील, ज्योत्स्ना मधुकर नवले, मनोज वसंत पाटील, महेश वसंत पाटील, मुकेश वसंत पाटील, किसन पांडुरंग पाटील, सुरेश पांडुरंग पाटील, प्रभाकर पांडुरंग पाटील, सविता केसरीनाथ वाघामरे, (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- सुरेखार, तालुका -अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ५७, एकूण क्षेत्र १-२०-१०(हे.आर.चौ.मी.) आकार १५ रु.५० पै.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २१/०३/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
सही/-
**विक्रांत झुंजारराव**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



दि. २०/०३/२०२४

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या मिळकतींचे विद्यमान मालक यांनी सदर मिळकत विक्रीस काढली असल्याचे आमचे अशिल श्री. नितीन वामन दांडेकर रा. ओम शांतीवन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ठाणे यांना खात्रीशीर समजले आहे.

वास्तविक, खाली परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही मुळची आमचे अशिल यांचे वडीलोपार्जित मालकी हक्काची व वहिवाटीची होती व आहे. सदर मिळकत मुळची आमचे अशिलांचे मयत आजोबा कै.जनार्दन गणपत दांडेकर यांचे मालकीची होती. त्यांचे मृत्यूनंतर सदर मिळकतीस आमचे अशिलांचे वडील मयत कै.वामन गणपत दांडेकर यांचेसह अन्य सहहिस्सेदारांची नोंद सदर मिळकती फेरफार अन्वये करण्यात आली आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे मयत वडील यांची तसेच त्यांचे मृत्यूनंतर आमचे अशिलांची मिळकत आहे. असे असताना विद्यमान कब्जेदार सदरी नोंदलेल्या इसमाचे वडिलांनी आमचे अशिलांचा वडिलांची फसवणूक करून, तसेच अन्य लोकांना अंधारात ठेवून सदर मिळकत त्यांचे नावे करण्यात आली आहे. असा बेकायदेशीर व बोगस फेरफार महसूल अधिकाऱ्यांना हाताशी धरून अस्तित्वात आणून सदर मिळकत स्वतःचे एकट्याचे नावे केली आहे. सद्यस्थितीत विद्यमान ७/१२ सदरी असलेल्या व्यक्तीने सदर मिळकत विक्रीस काढली असल्याची खात्रीशीर माहिती आमचे अशिलांना मिळाली आहे. आमचे अशिल सदर मिळकतीचे मालकी हक्कसंबंधाने झालेले फेरफार योग्य त्या न्यायालयात आव्हनित करणार असून त्यांना हक्काचे कायदेशीर मार्गाने करून घेत आहेत.

तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा साठेकरार, बयाणापावती, अगर खरेदीविक्रीचा दस्तऐवज अथवा कसलाही व्यवहार करू नये. अशा प्रकारे कोणाही इसमांनी हक्क अथवा अधिकार निर्माण केल्यास तो आमचे अशिलांचे सदर मिळकतीतील हिश्श्यावर बंधनकारक राहणार नाही. सदर व्यवहारामुळे कोणाचे कसल्याही प्रकारचे नुकसान झाल्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत. अथवा सदर व्यवहार आमचे अशिलांचे हितसंबंधावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे क्र. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| रेवदंडा | ४४/अ/५ | १-७७-०० | १७.७० |
| रेवदंडा | ६०/६७ | १-२६-०० | १२.६० |

**ॲड. जितेंद्र व्ही. भगत**
फोन नं. ९१६८४३९६६९



**जाहीर नोटीस**

याद्वारे कळविण्यात येते की, पॅपीलॉन को.ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. कर्जत चे खालील सभासद अथवा त्यांचे वारस यांनी सुमारे ७ वर्षाच्या कालावधीपासून संस्थेशी संपर्क साधला नाही अथवा त्यांचा ठाव ठिकाणा संस्थेस कळविला नाही. १) श्री. सिध्देश दाभोळकर २) श्री. लक्ष्मीकांत पाणीग्रही ३) श्री.अनिल म्हात्रे ४) श्रीमती. गीता पाणीग्रही.

तरी वरील सभासद अथवा त्यांचे वारस यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत वरील संस्थेचे सचिव श्री. पी.जी. मातोंडकर यांचेशी खालील पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सचिव, पॅपीलॉन को.ऑप.हौ.सो.लि. कर्जत
ARC आर्किटेक्ट व इंटिरियर्स,
शिवाजी मंदिर नाट्यगृह बिल्डींग,
एन.सी. केळकर रोड, दादर (प.),
मुंबई ४०० ०२८
मोबाईल नं. ९२२३२२९२२०



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की. मौजे-नेवाळी, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल खरेदीखताने मालकीहक्काने कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

**वरीलप्रमाणे परीशिष्ट**
**मौजे- नेवाळी, तालुका- पनवेल, जिल्हा रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | गट नं. व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री. मनोज एम. तुरकिया | २२/२७/२८ | ०.२५.०<br>०.०१.० पोटखराबा<br>०.२६.० एकुण क्षेत्र | ०.५९ |

सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टातील वर्णन केलेल्या मिळकती मधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/ किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारे हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०३/२०२४

**श्री. किशोर धाकड**
ॲडव्होकेट
ऑफिस नं. २१, म्युनिसिपल कॉम्प्लेक्स
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
पनवेल, ता. पनवेल, ४१०२०६
Email-kishordhakad@yahoo.co.in
Mobile No. 9867051330

**निवडक**

## सोनसाखळीची चोरी

**पनवेल:** रेल्वे प्रवासा दरम्यान, सोनसाखळीची चोरी झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. चिन्मय कुलकर्णी आपल्या पत्नीसह जालनावरून रेल्वेने घरी परत येत होते. ऑफिसच्या कामासाठी ते बेलापूर येथे उतरले. त्यांची पत्नी तळोजामध्ये घरी निघून गेली. या प्रवासा दरम्यान चोरट्याने त्यांच्याकडील एक लाख ६० रुपये किमतीची सोनसाखळी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## केबल चोरटा ताब्यात

**पनवेल :** कंपनीच्या गोडाऊन केबल चोरी करणाऱ्या चोरट्यास तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तालुक्यातील खुटारी येथील अधिराज कन्स्ट्रक्शन कंपनीच्या गोडाऊनमधून इलेक्ट्रिक वायर चोरी झाली होती. या प्रकरणी अब्दुल शेख या चोरट्यास पक्स्ले असता त्याच्या १० हजार रुपये किमतीची केबल आढळून आली आहे. दरम्यान, या घटनेची पोलीस अधिकारी कसून तपास करीत आहेत. तसेच या घटनेत आणखी कुणाचा हात आहे का? याचा शोध घेत आहेत.

## मोबाईल हिसकावून पसार

**पनवेल :** बसची वाट पाहत असलेल्या एका प्रवाशाच्या खिशातील मोबाईल हिसकावून चोरटा पसार झाल्याची घटना खारघर येथे घडली आहे. खारघर येथे राकेश चिले हे कोल्हापूर येथे जाण्यासाठी बसची वाट पाहत असताना अज्ञात चोरट्याने त्याच्या खिशातील मोबाईल हिसकावून तो पसार झाल्याने याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात अली आहे. सदर घटना वांरवार होत असल्याने नागरिक तसेच प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## अवैद्य मद्यसाठा हस्तगत

**पनवेल :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील चिंचपाडा, कामोठे या परिसरात पोलिसांच्या पथकाने छापा टाकून मद्यसाठा हस्तगत केला आहे. चिंचपाडा पुलाजवळ पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून अवैद्यरित्या दारू विक्री करणारे दोघेजण ताब्यात घेऊन त्यांच्याकडून मद्यसाठा हस्तगत करण्यात आला आहे. तर कामोठे पोलिसांनी सुद्धा परिसरात एक व्यक्ती विरोधात कारवाई करून त्याच्याकडून मद्यसाठा हस्तगत केला आहे.

## सावळ्यात दुचाकीची चोरी

**पनवेल :** धरणावर फिरण्यासाठी गेलेल्या तरुणांची दुचाकी चोरी गेल्याची घटना देवळोली धरणावर घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रसायनी सावळे गावातील एका व्यावसायिकाच्या मालकीची दुचाकी त्यांचा मुलगा व त्याचे मित्र देवळोली धरणावर घेऊन गेले होते. मरीआई मंदिराच्या जवळ दुचाकी उभी करुन धरणावर गेले. परंतू दोन तासांनी परत आल्यावर दुचाकी नसल्याने मुलांनी पोलिसांत घाव घेतली.

# वन क्षेत्रात खोदकाम

**झाडांची खुलेआम कत्तल**

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यात माथेरानचे डोंगरात असलेल्या १२ आदिवासी वाड्या यांना पक्का रस्ता तयार व्हावा, यासाठी आदिवासी लोक अनेक वर्षे लढा देत आहेत. मात्र, शासन आदिवासी लोकांचा रस्ता बनवत नाही. परंतु, केवळ चार घरांची वस्ती असलेल्या याच माथेरान डोंगरातील गार्बेटवाडीमध्ये पक्का रस्ता बनविला जात आहे. दरम्यान, माथेरानसारख्या संरक्षित वनामधून खुलेआम खोदकाम करून रस्ता बनविला जात आहे. माथेरान डोंगरातील एका वाडीसाठी एक न्याय आणि दुसऱ्या वाड्यांसाठी दुसरा न्याय अशी शासनाची भूमिका दिसून येत आहे.



बारा आदिवासी वाड्यांच्या बाजूला एक किलोमीटर उंचीवर खालापूर तालुक्याच्या हद्दीत असलेल्या गार्बेटवाडीत जाण्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने रस्ता बनविला जात आहे.

माथेरान संरक्षित वन म्हणून घोषित आहे. त्यामुळे अशा भागात खोदकाम करण्यास बंदी आहे. तरीदेखील माथेरान डोंगरातील गार्बेटवाडीकडे जाण्यासाठी थेट तीन किलोमीटर लांबीचा रस्ता शासन बनवत आहे. हा रस्ता शासनाकडून बनविला जात असून, या वाडीमध्ये केवळ चार कुटुंब सध्या राहत आहेत. तेथे ४० घरांची वस्ती होती. मात्र, दरड कोसळण्याच्या भीतीमुळे येथील रहिवाशी माथेरान गावात राहायला गेले आहेत.

मग चार कुटुंब यांच्यासाठी करोडो रुपये खर्च करून रस्ता का बनविला जातो, असा प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

डोंगरातील रस्त्यासाठी झाडे तोडून, माती खोदून रस्ता बनविला जात आहे. मात्र, त्याच डोंगरातील १२ आदिवासी वाड्यांसाठी वेगळा न्याय आणि चार घरांच्या गार्बेट वाडीसाठी वेगळा न्याय अशी दुटप्पी भूमिका माथेरानचे डोंगरात रस्ते बनविताना दिसून आली आहे. शासनाच्या या दुटप्पी भूमिकेबद्दल माथेरान डोंगरातील १२ आदिवासी वाड्यांमध्ये राहणारे आदिवासी लोक शासनाच्या भूमिकेबद्दल नाराज आहेत.

> संबंधित वाडीकडे जाणारा रस्ता हा तीन किलोमीटर लांबीचा असून तीन मीटर रुंदीचा आहे. या रस्त्यासाठी वन विभागाची जमीन मिळावी यासाठी रस्त्याचे बांधकाम करणाऱ्या शासनाच्या एजन्सीकडून परवानगी मागितली होती. त्यामुळे जिल्हा उपवन अधिकारी यांनी या रस्त्याची पाहणी केली आणि त्यानंतर वन जमीन रस्त्यासाठी देण्याचा निर्णय झाला आहे. रस्त्याच्या कामासाठी कोणत्याही प्रकारची झाडे तोडली जात नाहीत.
>
> –उमेश जंगम
> वनक्षेत्रपाल माथेरान नेरळ वनविभाग

# पुनाडे धरणाने गाठला तळ

**। उरण । वार्ताहर ।**

पुनाडे धरणाची पाणीपातळी झपाट्याने घसरत आहे. मार्च महिन्यात धरणातील पाणी २५ ते ३० फूट खाली गेल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे उरण पूर्व विभागातील आठ गावांची तहान भागविणारे पुनाडे धरण या वर्षीही तळ गाठण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सातत्याने या धरणाकडे होत असलेले प्रशासनाचे दुर्लक्ष या गोष्टीला जबाबदार असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने त्यात लक्ष घालावे, अशी मागणी उरण पूर्व विभागातील आठ गावांतील जनता विशेष करून महिला वर्ग करीत आहे.

शेतीच्या सिंचनासाठी

### ■ प्रशासनाचे सातत्याने या धरणाकडे दुर्लक्ष

लघु पाटबंधारे विभागाने उरण तालुक्यातील पुनाडे ग्रामपंचायत हद्दीत हे धरण (बंधारा) १९९१ साली बांधले. मात्र, या धरणाचे पाणी सिंचनासाठी उपयोगात येत नसल्यामुळे उरण पूर्व भागातील टंचाईग्रस्त आठ गावांनी या धरणाचे पाणी पिण्यासाठी वापरण्याची योजना राबविली. तेव्हापासून १.७५ एम सीएम एवढी पाण्याची क्षमता असलेले पुनाडे धरण उरणच्या पूर्व विभागातील पुनाडे, वशेणी, सारडे, पिरकोण, पाले, आवरे, गोवठणे, पाणदिवे या आठ गावांची तहान भागवत आहे.

मात्र, यावर्षी कोकण किनारपट्टीवरील उरण सारख्या तालुक्यात ही पावसाचे प्रमाण कमी झाल्याने धरणात पाणीसाठा कमी प्रमाणात झाला आहे. त्यातच धरणातून होणारे पाण्याचे लिकेज, वाढती उष्णता यामुळे धरणातील पाणी २५ ते ३० फूट खाली गेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. एकंदरीत प्रशासनाच्या नाकर्ते पणामुळे उरण पुर्व विभागातील आठ गावांची तहान भागविणारे पुनाडे धरण तळ गाठण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी संबंधित प्रशासनाने पुनाडे धरणात पाणीसाठा पावसाळ्यात कशा प्रकारे वाढेल यासाठी उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी या परिसरातील महिला वर्ग करीत आहेत.





● रंगपंचमीनिमित्त रंगाची उधळण करण्यासाठी विविध प्रकारच्या-आकाराच्या पिचकारी अलिबागमधील पंतनगर येथे विक्रीसाठी आल्या आहेत. (छायाचित्र :समीर मालोदे )

# सोंडाई गडावर अडकलेल्या विद्यार्थ्यांची सुटका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

सोंडाईगडावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या अनोळखी ट्रेकर्स रस्ता भरकटले. रात्रीच्या अंधारात गडावर जाण्याचा त्यांचा प्रयत्न फसला आणि आयटी विद्यार्थी असलेले तरुण भरकटले. दरम्यान, माऊंट एव्हरेस्ट वीर गिर्यारोहक संतोष दगडे यांनी आपल्या सहकारी गिर्यारोहक यांच्यासह त्या रस्ता भरकटलेल्या सात जणांना सुखरूप मुख्य रस्त्यावर आणले.



सोमवारी (दि.१८) मध्यरात्री मुंबई येथे आयटी शिक्षण घेत असलेले तरुण कर्जत जवळील सोंडाईगड किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी आले होते. राजस्थान आणि आग्रा येथील मूळ रहिवासी असलेले हे तरुण मध्यरात्री एक वाजता कर्जत रेल्वे स्थानकात पोहचले. सात तरुण आपला दुसरा ट्रेक करण्यासाठी सोंडाईगड किल्ल्याकडे निघाले होते.

कर्जत स्टेशन जवळील युको बँक येथून रिक्षाने ते वावरले ठाकूरवाडी येथे पोहचले. त्यावेळी पहाटेचे तीन वाजले होते आणि तेथे स्थानिक आदिवासी लोकांची कोणतीही मदत न घेता ते तरुण सोंडाईगड किल्ल्याचा फलक बघून गड चढू लागले. त्यावेळी रात्रीच्या अंधारात थकून थांबले त्यावेळी त्यांना तेथून खाली येणे शक्य नव्हते.

### ■ रात्रीच्या अंधारात केला प्रवास

मंगळवारी (दि.१९) सकाळी साडे सात वाजता कर्जत येथील माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करणारे संतोष दगडे, विवेक शिवडे, राहुल मेश्राम यांना बोलावण्यात आले. त्यानुसार सोंडाईगड किल्ल्यावर रस्ता भरकटलेल्या तरुणांना शोध घेण्यास सुरुवात केली.

सकाळी नऊ वाजता कर्जत येथून मदतीसाठी निघालेले गिर्यारोहक सोंदाई गडावर पोहचले आणि त्या सात तरुणांना शोधू लागले. पहाटे तीन वाजता गड चढायला निघालेले ते आयटी शिक्षण घेणारे तरुण यांच्याकडे केवळ एक लिटर पाणी होते. गिर्यारोहक असल्याने संतोष दगडे यांना हौशी ट्रेकर्स यांची कार्यपध्दती माहिती असल्याने सोबत जाताना पाणी, बिस्किटे नेली होती.

२१ वयोगटातील रस्ता भरकटलेल्या त्या तरुणांपर्यंत पोहचल्यावर त्या सर्व सात जणांना चालणे देखील शक्य नसल्याचे दिसून आले. त्यातील दोन तरुण हे पूर्ण थकून जमिनीवर पडले होते. साधारण दोन तास आराम करून ४५ मिनिटे परतीचा प्रवास करून संतोष दगडे आणि सूरज प्रजापती यांनी त्या सात जणांना ठाकूर वाडी येथे आणले. त्या तरुणांपर्यंत पोहचण्यासाठी घेतलेली मेहनत याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# पनवेल परिसरात दोघांचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या दुर्घटनेत दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तालुक्यातील खैरवाडी जवळील मोरबे धरणात आपल्या मित्र मैत्रिणींसह सहलीसाठी गेलेल्या अवधूत भोसले (वय २४) याचा पाय घसरून तो पाण्यात पडल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात अली आहे. तर दुसऱ्या घटनेत दापोली पारगाव येथे राहणार राहुल जितेकर (वय ३२) हा त्याच्या स्कुटीवरून पनवेलकडून कळंबोलीकडे चिंचपाडा ब्रिजकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडकडे जाण्यासाठी युटर्न घेत होते. यावेळी चिंचपाडा ब्रिजकडून कळंबोली सर्कलकडे येणाऱ्या कैलास खारडे यांनी त्यांच्या ताब्यातील चारचाकी वाहन वेगाने चालवीत त्याच्या स्कुटीला जोरदार धडक देऊन झालेल्या अपघातात राहुल जितेकर याचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेलमध्ये पोलीस संचलन

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुका पोलिसांनी वावंजे गाव व नेरे गाव परिसरात पोलीस संचलन करण्यात आले. लोकसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने आणि वरीष्ठांच्या सूचनेनुसार पनवेल तालुका पोलीस ठाण्यासाठी १ आरपीएफ कंपनी पुरविण्यात आली आहे. आरपीएफ कंपनीमध्ये ३ अधिकारी, २९ अंमलदार २ पोनि, ३ सपोनि/पोउपनि व ३० पोलीस अंमलदार व झोन २ स्ट्रायकींग वरील १ अधिकारी, १० अंमलदार यांनी पोलीस ठाणे हद्दीतील महत्त्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परीसरातील परीस्थितीची माहिती देण्यात आली.

# वाचन संस्कृती वाढण्यास होणार मदत

**सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालयाचा स्पूत्य उपक्रम**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लहानांपासून मोठ्यांपर्यंत दिवसेंदिवस कमी होणारी वाचनाची सवय विद्यार्थी दशेपासूनच पुन्हा वाढवी यासाठी अलिबाग येथील सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालयाच्या माध्यमातून चला ग्रंथालय सहलीला हा उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. तालुक्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना ग्रंथालयात बोलावून त्यांना ग्रंथालयातील पुस्तकांची तेथील ग्रंथ संपदेची माहिती करुन दिली जाते.

सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील यांनी ही संकल्पना मांडली असून अलिबाग तालुक्यात यास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. एखाद्या ऐतिहासिक ठिकाणी ज्या प्रमाणे विद्यार्थी जसे सहलीला येऊन त्या वास्तुचे महत्व लक्षात घेतात, त्याच प्रमाणे ग्रंथालय सहलीला आलेले विद्यार्थी ग्रंथसंपदा,



पुस्तकांमधील ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पाहुन वाचनालयातील कर्मचाऱ्यांमध्येही उत्साह वाढला आहे. येणाऱ्या वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थांचे स्वागत करतात, त्यांना वाचनासाठी बसण्याची व्यवस्था करतात. यातून या विद्यार्थ्यांना वाचनालयामधील कपाटांमध्ये ठेवलेल्या विविध विषयांची पुस्तके हाताळण्याची संधी मिळत आहे.

विद्यार्थांनी मागणी केलेले पुस्तक वाचनालयाचे अमित धुमाळ, अंकित म्हात्रे, अर्चना माळवी, सुरेश काटे हे कर्मचारी तत्परतेने काढून देतात. ग्रंथालय सहलीमुळे वाचनालयात पुन्हा एकदा विद्यार्थ्यांचा वावर वाढू लागला आहे, यातून उद्याची संस्कारी, सुशिक्षित पिढी तयार होईल, असा विश्वास सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, कार्याध्यक्षा शैला पाटील यांनी व्यक्त केला.

# पर्यटकांची संख्या रोडावली

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील पर्यटन क्षेत्रावर आज पर्यटकांची संख्या मोजण्याइतके दिसून येत असल्याने स्थानिक स्टॉलधारक चिंतेत दिसून येत आहेत. मुरुड पर्यटन क्षेत्रापैकी राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी शेकडो पर्यटक रोज ये-जा करिता असतात. आज याठिकाणी ही पर्यटक कमी आल्याने शिडाच्या बोटीचे चालक-मालकांना एक बोट भरताना ही तासाने तास पर्यटकांना वाट पाहत बसावे लागत आहेत. ही परिस्थिती मागील दोन महिन्यांपासून सुरू आहे. वाढती उष्णेतेचा पर्यटनावर मोठा फटका बसत असल्याचे स्थानिकाचे म्हणणे आहे.

# कर्जतमध्ये गावठी कडधान्याची लागवड

**विनय वेखंडे यांचा सेंद्रिय शेतीचा प्रयोग**

**। नेरळ । वार्ताहर ।**

**राजनाला कालवा परिसरातील शेतकरी विनय वेखंडे हे कर्जत तालुक्यातील प्रगत शेतकरी म्हणून ओळखले जातात. वदप येथील यावर्षी त्यांनी आपल्या शेतात कडधान्य पिकांची शेती केली आहे.त्यांच्या शेतात यावर्षी वाल, मूग, तुर, चणे यांची शेती बहरलेली असून त्यांच्या शेतातील सेंद्रिय जमिनीवर पिकवलेली कडधान्य नवी मुंबई येथील बाजारात चांगला बाजारभाव मिळवत आहेत.**

कर्जतच्या पूर्व भागात वदप येथे विनय वेखंडे यांची मिलिंद बाग येथे शेती आहे. त्या शेतीमध्ये दरवर्षी साधारण १५ एकर जमिनीवर वेगवेगळ्या प्रकारची शेती करतात.भाताच्या शेती बरोबर यावर्षी त्यांनी मोठ्या प्रमाणात कडधान्याची शेती केली



होती. त्यांनी साधारण सहा एकर जमिनीवर केली होती. त्यात वालाचे गावठी बियाणे यांचा वापर करून दोन एकर जमिनीवर तर तुर डाळीचे उत्पन्न घेण्यासाठी गावठी तुरीचे उत्पादन घेण्यासाठी एक एकरात बियाणे टाकले होते. त्याचवेळी हिरवे मूग यांचे दोन एकरात शेती केली होती.त्याचवेळी घरगुती वापरासाठी हरभरा आणि मटकी यांची देखील शेती विनय वेखंडे यांनी आपल्या शेतात केली होती.नोव्हेंबर महिन्यात या सर्व शेतीसाठी ट्रॅक्टर मधून नांगरणी करून बियाणे यांची पेरणी केली होती.

मार्च महिन्यात त्यांच्या शेतामधून तब्बल ५०० किलो वालाचे उत्पादन निघाले असून तुर डाळी साठी वापरली जाणारी तुर यांचे उत्पादन काढणीवर आहे. ते देखील साधारण २०० किलो उत्पादन होईल असा कयास तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड आणि मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी यांनी व्यक्त केला आहे.

दोन एकर जमिनीवर टाकलेल्या बियाणे मधून तब्बल ५०० किलो मूग याचे उत्पादन झाले आहे. हरभरा शेतीमधून चणे यांचे झालेले उत्पादन हे आपल्या नातेवाईक यांच्यासाठी राखीव ठेवले आहे.

वालाचे शेंगांची पोपटी विशेष लोकप्रिय असते आणि त्यासाठी गावठी वालाची शेंगा खरेदी करण्यासाठी खवय्ये हे वदप येथे येऊन कच्च्या शेंगा खरेदी करायचे.त्यानंतर गावठी वाल यांचा बिर्डा अगदी चवीष्ट असतो आणि त्यामुळे त्यासाठी महिला वर्ग गावठी वाल आपल्या घरी साठवून ठेवत असतात. गावठी वाल याला मोठी मागणी असून सर्व वाल विनय वेखंडे यांनी नवी मुंबई येथील बाजारात विकण्यास पाठवला आहे.

बाजारात गावठी वाल हा साधारण १८० ते २०० रुपये किलोने विकला जात आहे.त्याचवेळी मूग देखील मोठ्या विक्री साठी उपलब्ध असून हिरव्या मूग याला मोठी मागणी आहे.आज पर्यंत ४०० किलो मूग नवी मुंबईत विक्री साठी पाठवला असून तुर काढणी नंतर त्याची देखील विक्री वेखंड हे करणार आहेत. गावठी कडधान्य यांची शेती प्रगत शेतकरी विनय वेखंडे यांच्याकडे विशेष मागणी आहे.

# पर्यावरणपूरक होळी साजरी करा

**। सारळ । वार्ताहर ।**

होळी हा हिंदूंचा सांस्कृतिक व धार्मिक सण आहे. या सणाचे महत्त्व म्हणजे, आपल्यामधील दुर्गुण होळीत टाकून त्यांचे रूपांतर सद्गुणांमध्ये, चांगल्या गुणांमध्ये होऊन आपण चांगले वागू, असा संकल्प केला जातो. जे वाईट असेल ते होळीमध्ये जळून जाईल. चांगल्या विचारांचा, चांगल्या सुभाषितांचा शिमगा करा, अपशब्दांची, शिव्यांची होळी करा. हा सण पौराणिक काळापासून सुरू आहे. होळी सणाचा संदेश वाईट गोष्टींना जाळून चांगल्या गोष्टींचे संरक्षण करणे असा होतो. शहरांमध्ये तसेच खेडेगावांमध्ये अनेक ठिकाणी



होळी सणानिमित्त होळ्या पेटविण्यात येतात. होळी पेटविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लाकडाचा वापर केला जातो. रात्रभर या होळीमध्ये लाकडे जाळल्या जातात. यावेळी अनेक चांगली हिरवीगार झाडे तोडली जातात. त्यासाठी वृक्षतोड करू नका.

# विकास म्हणजे काय?

निवडणुकांमध्ये सर्वच पक्ष आपण विकास करणार असल्याचे सांगतात. नरेंद्र मोदींचा भाजप तर असं सांगतो की देशात गेल्या ७० वर्षात विकासच झाला नव्हता. त्याची सुरुवातच मुळी मोदी आल्यानंतर म्हणजे २०१४ ला झाली. विकासाला साथ देण्यासाठीच आपण पक्ष सोडून गेलो असे एकनाथ शिंदे, अजित पवार किंवा अशोक चव्हाण यांच्यासारखे अनुभवी नेते सांगतात. तीच गोष्ट बिहारात नीतीशकुमार सांगतात. इतके अनुभवी नेते एकत्र जमा होऊनही देशातली गरिबी, बेकारी काही हटत नाही. देशातील दारिद्र्य रेषेखालच्या लोकांची संख्या पाच टक्क्यांहूनही कमी राहिली असल्याचा दावा मोदींच्या भाजपने अलिकडे केला. शिवाय, देशात प्रचंड प्रमाणात रस्ते, पूल इत्यादी बांधले जात असल्याच्या जाहिराती सतत झळकत असतात. मुंबई शेअर बाजार गेले दोन-तीन दिवस नरम असला तरी गेल्या काही महिन्यांमध्ये जगाने तोंडात बोटे घालावी अशा प्रमाणात वर उसळत चालला आहे. पण आपल्या आजूबाजूला जे काही चालू आहे तो खरेच विकास आहे? काय लोकांची इच्छा विचारात घेऊन खरेच हे सर्व चालले आहे काय? बुलेट ट्रेन प्रकल्पाचे उदाहरण घ्या. अशी वेगवान रेल्वेगाडी चालू करावी अशी मागणी लोकांनी कधीही केलेली नव्हती. या प्रकल्पासाठी एक लाख कोटींहून अधिक खर्च येणार आहे. मुंबई ते अहमदाबाद हे अंतर सुमारे ५०८ किलोमीटर आहे. या ट्रेनचा सर्वाधिक वेग ताशी सुमारे साडेतीनशे किलोमीटर असेल. म्हणजे हे अंतर साधारणपणे दोन तासात पार होईल. यासाठी खास नवीन लोहमार्ग टाकला जात आहे. भारतातल्या सर्वसाधारण रेल्वेगाड्यांचा वेग ताशी सुमारे पन्नास किलोमीटर असतो. अलिकडे वंदे भारत वगैरे ज्या गाड्या सुरू झाल्या आहेत त्यांचा वेग ताशी १६० किलोमीटरपर्यंत जाऊ शकतो. बुलेट ट्रेनच्या मार्गावरून गरिबांच्या साध्या पन्नासचा वेग असलेल्या गाड्या धावू शकणार नाहीत. कारण, त्या गाड्यांचा बुलेट ट्रेनला अडथळा होईल.

### एसटीचेही तेच

मोदींच्या म्हणण्यानुसार, या देशात भुकेने मरणाऱ्यांची संख्या कदाचित कमी झालीही असेल. पण तरीही या देशातील बहुसंख्य लोक गरिबच आहेत. बुलेट ट्रेनचे तिकिट हे विमानापेक्षाही महाग असेल. त्यामुळे या बहुसंख्य गरिबांना ते परवडणार नाही. शिवाय या ट्रेनने जाण्याची त्यांची इच्छाही नसेल. हे गरीब दोन मोठ्या शहरांमध्येच असतील असे नव्हे. ते अधल्यामधल्या गावांमधले असतील व त्यांना प्रवास करण्याची गरज असेल. त्यासाठी त्यांना जास्तीत जास्त स्टेशन्सवर थांबणारी गाडीच लागेल. तिथे थेट इकडून तिकडे धावत जाणाऱ्या गाडीचा उपयोग नसेल. आज या देशातील सामान्यांच्या रेल्वे गाड्यांची हालत अत्यंत खराब आहे. आपल्या कोकण रेल्वेच्या पॅसेंजर गाड्या म्हणजे चालते-फिरते गोठे किंवा कोंडवाडे असतात. शिवाय या गाड्या नेहमी हमखास उशिराने धावतात. हजारो प्रवाशांचे कित्येक तास यात वाया जातात. या गाड्यांची स्थिती सुधारावी आणि संख्या वाढवावी या सामान्य माणसाच्या मागण्या असतात. पण त्यांचा निवडणूक जाहीरनाम्यांमध्ये कोठे उल्लेखही होत नाही. तीच स्थिती महाराष्ट्रातील एसटीची आहे. अलिकडे महिलांना पन्नास टक्के सवलत दिल्यानंतर ठिकठिकाणी गाड्यांची गर्दी वाढली. याचा अर्थ लोकांना एसटीची सेवा हवी आहे. ती भरवशाची नाही म्हणून ते रिक्षा, वडाप किंवा जीपने जाऊ-येऊ लागले होते. आता ती स्वस्त झाल्यानंतर बेभरवशीपणाचा त्रास सोसूनही ते एसटीने जायला तयार आहेत. याचाच अर्थ लोकांना अधिकाधिक गाड्या हव्या आहेत. अलिकडे तालुक्याहून गावागावात जाणाऱ्या तसेच कोकणातून मुंबईला जाणाऱ्या गाड्यांमध्येही कपात करण्यात आली होती. खरे तर ही लोकांची गरज आहे. पण त्यांच्या वतीने बोलणारा कोणी नाही. आपल्या शेजारील कर्नाटक राज्यातील एसटीची सेवा उत्तम रीतीने चालू आहे. तशी ती आपल्याला का चालवता येऊ नये हा प्रश्न आहे. पण मोदी आणि मंडळीच्या विकासामध्ये याला काहीच महत्व नाही.

### नुसताच चकचकाट

अलिकडे सर्वत्र रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात केली जातात. मुंबई ते नागपूर समृध्दी मार्गाचा गाजावाजा करण्यात आला. शिवडी ते न्हावाशेवा पारबंदर प्रकल्पाच्या मोठ्या बातम्या झाल्या. मुंबईत तर सध्या इतकी भुयारी मार्ग आणि मेट्रोची कामे सुरू आहेत की सर्वत्र प्रचंड धूळ व प्रदूषण झाले आहे. प्रदूषण मंडळाला त्यामुळे या प्रकल्पांना नोटीस देऊन बंद करणे भाग पडले होते. हा एकाच मुंबईचा इतका प्रचंड विकास सर्वांना हवा आहे का यावर मात्र कोणीही बोलत नाही. १९७०-८० च्या दशकात मुंबईतून उद्योगच नव्हे तर मंत्रालयही बाहेर हलवा असे लोक म्हणत असत. आता ते सर्व विसरले गेले आहे. मुंबई-पुण्याच्या काही ठराविक भागात चकचकीत, प्रचंड टोलचे रस्ते व त्यावर धावणाऱ्या पॉश श्रीमंती गाड्या दिसल्या की विकास झाला असे सर्वांना वाटू लागले आहे. पण या दोन शहरांपासून पन्नास किलोमीटरवर असलेल्या खेड्यांमध्ये रस्ता धड नाही आणि एसटी बंद झाल्यामुळे टमटम रिक्षाखेरीज पर्याय नाही अशी अवस्था आहे. अलिकडेच उत्तराखंडमध्ये सिल्कियारा बोगद्यात दरड कोसळल्यामुळे अनेक कामगार बरेच दिवस अडकून पडले होते. बाकी सर्व उपाय थकल्यावर शेवटी ही दरड काढण्यासाठी दिल्लीच्या सफाई कामगारांना बोलवावे लागले होते. अत्यंत छोट्या बिळासारख्या जागेत घुसून काम करण्याचे कसब या कामगारांकडे असते. त्यांच्यामुळेच बोगद्यातल्या सर्व कामगारांची सुटका झाली. पण त्या सफाई कामगारांना यात काय मिळाले? तर जवळपास काहीही नाही. उलट त्यांच्यातल्या एकाचे घर बेकायदा ठरवून अलिकडेच बुलडोझरने पाडण्यात आले. आणि, तिकडे सिल्कियारा बोगदा बेकायदेशीरपणे बांधणाऱ्या नवयुग नावाच्या कंपनीच्या मालकाने शेकडो कोटी रुपये निवडणूक रोख्यांमधून देणगी म्हणून दिल्याचे निष्पन्न झाले. मोदी आणि मंडळी सांगताहेत तो असला विकास आहे. ज्याच्यात लोकांच्या मागण्या काय आहेत याला कसलीही किंमत नाही. किंबहुना, गरिबांच्या जगण्याचा कसलाच विचारदेखील नाही.

विचार

# लढवय्ये गोलंदाज

**क्रिकेटमध्ये फलंदाजांनी झळकावलेली शतके, संघाच्या विजयातला त्यांचा वाटा याची चर्चा अधिक होते. मात्र संघाच्या विजयात गोलंदाजांचाही मोलाचा वाटा असतो. गोलंदाजही खोऱ्याने बळी मिळवत नवनवे विक्रम रचत असतो. भारताचा फिरकी गोलंदाज रवीचंद्रन अश्विन आणि इंग्लंडचा जलदगती गोलंदाज जेम्स अँडरसन यांनी नुकतीच नव्या विक्रमांना गवसणी घातली. पैकी अश्विनची कामगिरी खूपच आश्वासक आहे. या विक्रमी गोलंदाजांविषयी.**



**श्रीशा वागळे**

रवीचंद्रन अश्विन... भारताचा आघाडीचा फिरकी गोलंदाज. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये नुकताच पाचशे बळींचा टप्पा ओलांडला. शंभर कसोटी सामन्यांमध्ये त्याने ही कामगिरी करून दाखवली. तिकडे इंग्लंडच्या जेम्स अँडरसननेही कसोटी क्रिकेटमध्ये सातशे बळी मिळवत नवा इतिहास रचला. अशी कामगिरी करणारा तो पहिलाच जलदगती गोलंदाज ठरला. भारत आणि इंग्लंडदरम्यान नुकत्याच संपलेल्या कसोटी मालिकेत या दोन गोलंदाजांनी भरीव कामगिरी करत नव्या विक्रमांना गवसणी घातली. क्रिकेटमध्ये सर्वसाधारणपणे फलंदाजांच्या कामगिरीची अधिक चर्चा होत असते. त्यांच्याभोवती एक वेगळंच वलय असतं. मात्र गोलंदाजही संघाच्या विजयात महत्त्वाचा वाटा उचलत असतात. अनेकदा गोलंदाजच विजयाचे शिल्पकार ठरत असतात. मात्र फलंदाजांच्या तुलनेत त्यांची काम गिरी काहीशी झाकोळली जाते. पण अश्विन आणि अँडरसन यांनी एकाच कसोटी मालिकेत बळींच्या बाबतीत मैलाचा दगड पार केल्यानंतर क्रिकेटविश्वात गोलंदाजांची कामगिरीही चर्चेचा विषय ठरली आहे.

क्रिकेटच्या इतिहासात आजवर एकापेक्षा एक सर्वोत्तम गोलंदाजांची नोंद झाली आहे. फलंदाजांचा कर्दनकाळ अशी बिरूदावली मिळवणारे अनेक गोलंदाज होऊन गेले. अनेक जलदगती आणि फिरकी गोलंदाजांनी क्रिकेटविश्वावर आपला खास ठसा उमटवला. जलदगती गोलंदाजी हे पाश्चिमात्य देशांचे बलस्थान तर आशिया खंडातल्या भारत, पाकिस्तान आणि श्रीलंका या देशांकडे प्रभावी फिरकी गोलंदाजांचा ताफा. भारताने तर एकापेक्षा एक सरस फिरकी गोलंदाज दिले. बेदी, प्रसन्ना आणि चंद्रशेखर या त्रिकुटाने एक काळ गाजवला. त्यानंतर अनिल कुंबळे भारताचा हुकुमी एक्का बनला. हरभजन सिंगनेही गुणवत्ता दाखवून दिली. आजही अनिल कुंबळे हा सर्वाधिक बळी घेणारा भारतीय गोलंदाज आहे. मधल्या काळात अनेक फिरकी गोलंदाज भारतीय संघात दाखल झाले. मात्र प्रत्येकालाच संघातले स्थान राखला आले नाही. रविचंद्रन अश्विनने गुणवत्तेला प्रयत्नांची जोड देत भारतीय क्रिकेट संघात स्थान निर्माण केले. अश्विन टप्प्याटप्प्याने यशाच्या पायऱ्या चढत गेला. त्याने भारताच्या कसोटी विजयात महत्त्वाचा वाटा उचलला. मात्र रोहित शर्मा, विराट कोहली, महेंद्रसिंह धोनी, रवींद्र जडेजा आणि अगदी जसप्रीत बुमराह या समकालीन खेळाडूंइतके 'स्टारडम' अश्विनला लाभले नाही. तो संघातला 'लो प्रोफाईल' खेळाडूच राहिला. त्याला अनेकदा संघाबाहेरही बसावे लागले. मात्र संधीचे सोने करण्याचे कसब अश्विनने आत्मसात केले होते. अश्विनच्या नावे अनेक विक्रम आहेत. पाचशे किंवा त्याहून अधिक बळी मिळवणारा अश्विन हा क्रिकेट इतिहासातला फक्त नववा गोलंदाज आहे. अश्विनने इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटींच्या मालिकेत २६ बळी मिळवले. कसोटी मालिकेत सातहून अधिक वेळा २५ पेक्षा अधिक बळी मिळवण्याची कामगिरी करत अश्विनने मुथय्या मुरलीधरनचा विक्रमही मोडला. तसेच धरमशाला कसोटीमध्ये एका डावात छत्तीसाव्या वेळी पाच बळी मिळवत त्याने अनिल कुंबळेचा ३५ वेळा पाच बळी मिळवण्याचा विक्रमही मोडला. तसेच भारतीय भूमीवर सर्वाधिक बळी मिळवण्याचा कुंबळेचा विक्रमही अश्विनने मागे टाकला. आणखी एक लक्षवेधी बाब म्हणजे आपल्या पहिल्या आणि शंभराव्या कसोटीमध्ये एका डावात पाच बळी टिपणारा अश्विन हा क्रिकेटच्या इतिहासातला पहिलाच गोलंदाज ठरला आहे.

२०११ मध्ये कसोटी पदार्पण करणारा रवीचंद्रन अश्विन अविरत तेरा वर्षे क्रिकेट खेळतो आहे. तो भारतीय गोलंदाजीचा आधारस्तंभ बनला आहे. अश्विनची आकडेवारीच त्याची महानता सिद्ध करण्यास पुरेशी आहे. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये एक-दोन नव्हे तर तब्बल दहा वेळा स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा किताब पटकावला आहे. सचिन तेंडुलकर आणि वीरेंद्र सेहवाग यांना प्रत्येकी पाच वेळा हा मान मिळाला असून कपिल देव, अनिल कुंबळे, राहुल द्रविड आणि हरभजन सिंग यांना प्रत्येकी चार वेळा हा किताब मिळाला आहे. विराट कोहलीने तीन वेळा अशी कामगिरी केली असून रोहित शर्मा आणि रवींद्र जडेजा यांना एकदाही हा किताब मिळालेला नाही. अश्विन हा सर्वात कमी कसोटी सामन्यांमध्ये ५०, १००, १५०, २००, २५०, ३००, ३५०, ४००, ४५० आणि ५०० बळी मिळवणारा भारतीय गोलंदाज आहे, हे कदाचित कोणाला फारसे माहीतही नसावे. जसप्रीत बुमराहने ३४ कसोटी सामन्यांमध्ये १५० बळी मिळवण्याची कामगिरी केल्यानंतर त्याचे कोण कौतुक झाले, मात्र अश्विनने ही कामगिरी फक्त २९ सामन्यांमध्ये करून दाखवली आहे. भारताला गोलंदाजीच्या बळावर कसोटीत विजय मिळवून द्यायची अश्विनची टक्केवारीही सरस आहे. अश्विनने फिरकीला साथ देणाऱ्या भारतातीलच नाही तर ऑस्ट्रेलिया, इंग्लंडमधील खेळपट्ट्यांवरही यश मिळवले आहे. भारतीय गोलंदाजांमध्ये सध्या अश्विनच्या पुढे फक्त अनिल कुंबळे आहे. कुंबळेच्या नावे ६१९ बळी आहेत. अश्विनही कुंबळेचा चाहता आहे. त्यामुळेच की काय, त्याने ६१८ बळी मिळवून निवृत्त होण्याचा मनोदय कधी काळी व्यक्त केला होता.

अश्विन एक उत्तम फलंदाजही आहे. खेळपट्टीवर अश्विन असेल तर भारतीय संघाला फारशी काळजी नसते. त्याने फलंदाजीच्या बळावरही कसोटी जिंकून दिल्या किंवा अनिर्णित राखल्या आहेत. अश्विनच्या नावे कसोटी क्रिकेटमध्ये पाच शतके आहेत. कसोटी क्रिकेटमधल्या त्याच्या शतकांची संख्या भारताच्या काही नावाजलेल्या फलंदाजांपेक्षाही अधिक आहे. त्याने शिखर धवन, ऋषभ पंत आणि वसिम जाफर यांच्यापेक्षा अधिक कसोटी अर्धशतके ठोकली आहेत! अश्विन हा विचारी आणि हुशार क्रिकेटपटू आहे. त्याच्यात कर्णधार होण्याची क्षमता आहे. मात्र नशिबाने त्याला नेहमीच हुलकावणी दिली. मात्र अश्विनने त्याचा फारसा विचार न करता आपल्या कर्मालाच सर्वोच्च स्थानी राखले. वलयांकित राहण्यापेक्षा देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याला महत्त्व दिले. म्हणूनच अश्विन या ऐतिहासिक स्थानी पोहोचला.

भारताने इंग्लंडविरुद्धची पाच सामन्यांची कसोटी मालिका ४-१ अशी जिंकली असली तरी इंग्लंडच्या जेम्स अँडरसनने या मालिकेवर ठसा उमटवला. अखेरच्या धरमशाला कसोटीत त्याने सातशे बळींचा टप्पा गाठला. वयाच्या ४१ व्या वर्षीही जेम्स अँडरसन हाच इंग्लंडचा प्रमुख गोलंदाज आहे. या वयातही तो इंग्लंडच्या गोलंदाजीची धुरा समर्थपणे वाहतो आहे. जलदगती गोलंदाजांना सतत दुखापतींना सामोरे जावे लागते. मात्र अँडरसन वयाच्या ४१ व्या वर्षीही तंदुरुस्त आहे. अनेक जलदगती गोलंदाज कमी वयात निवृत्ती घेत असताना अँडरसन मात्र क्रिकेटच्या मैदानात घाम गाळत आहे. कसोटी क्रिकेटने अनेक महान जलदगती गोलंदाज दिले. मात्र कोणत्याही जलदगती गोलंदाजाला ७०० बळी मिळवता आले नाहीत. परिणामी, अँडरसन सार्वकालिन महान जलदगती गोलंदाजांच्या पंगतीत जाऊन बसला आहे. सर्वाधिक कसोटी बळी मिळवणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत मुथय्या मुरलीधरन आणि शेन वॉर्न यांच्यानंतर तो तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. अँडरसन हा सर्वाधिक कसोटी सामने खेळणारा ब्रिटिश क्रिकेटपटू असून त्याने एका डावात ३२ वेळा पाच बळी मिळवले आहेत. त्याची इकॉनॉमीही २.७९ इतकी कमी आहे.

अँडरसनच्या भात्यात अनेक अस्त्रे आहेत. चेंडू दोन्ही बाजुंना स्विंग करण्याचे त्याचे कौशल्य अनोखे म्हटले पाहिजे. जलदगती गोलंदाजी म्हणजे फक्त भन्नाट वेग आणि उसळते चेंडू नाहीत, तर त्यापेक्षाही बरेच काही आहे, हे अँडरसनने आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत वारंवार दाखवून दिले. त्याने संपूर्ण कारकिर्दीत सातत्यपूर्ण कामगिरी केली. म्हणूनच तो आजही इंग्लंड संघाचे अविभाज्य अंग आहे. अँडरसनचे कौशल्य आणि त्याने राखलेली तंदुरूस्ती याचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. वयाच्या ४१ व्या वर्षी असलेला त्याचा आवेश तरुण गोलंदाजांनाही लाजवणारा आहे. तरुण आणि उमद्या गोलंदाजांनी अँडरसनकडून तंदुरुस्तीचे धडे घ्यायला हवेत. जेम्स अँडरसन आणि रवीचंद्रन अश्विन हे परस्परभिन्न गोलंदाज. मात्र त्यांनी आपापल्या कारकिर्दीत पार केलेले मैलाचे दगड गोलंदाजांचे क्रिकेटमधले महत्त्व अधोरेखित करतात. त्या दोघांची क्रिकेटप्रती असणारी समर्पित वृत्ती आणि संघभावना जपत निस्वार्थीपणे केलेला खेळ आदर्शवत आहे, यात शंका नाही.

आजकाल

# देशभरात पाणीटंचाईचे उग्र संकट

काही अपवाद वगळता देशाच्या बहुतांश भागांत मार्चच्या मध्यातच पाण्याची तीव्र टंचाई झाली आहे. आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, बिहार, नागालँड ही राज्ये भीषण टंचाईचा सामना करीत आहेत. महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठवाड्यात टंचाईची स्थिती आहे. वाढत्या उन्हाच्या चटक्यांबरोबर टंचाईच्या झळाही वाढणार असल्यामुळे उपलब्ध जलसाठा जून अखेर पुरवून वापरण्याचे आव्हान आहे.

केंद्रीय जल आयोगाने देशातील प्रमुख १५० जलसाठ्यांतील पाण्याचा आढावा घेतला आहे. त्यानुसार दक्षिण भारतात केरळ वगळता सर्वत्र भीषण पाणी टंचाई आहे. तेलंगणातील प्रमुख सात धरणांनी तळ गाठला असून, धरणांत केवळ ३५ टक्के पाणी आहे. आंध्र प्रदेशातील चार धरणांत तेरा टक्के पाणी आहे. कर्नाटकातील १६ धरणांत २६ टक्के पाणीसाठा आहे. तमिळनाडूतील सात धरणांत ३० टक्के पाणीसाठी शिल्लक राहिला आहे. मागील दहा वर्षांच्या सरासरी जलसाठ्याचा विचार करता, आंध्र प्रदेशात ६८ टक्के, तेलंगणात १० टक्के, कर्नाटकात २६ आणि तमिळनाडूत २७ टक्के कमी पाणीसाठा आहे.

मध्य भारतात उत्तर प्रदेशातील प्रमुख आठ जलाशयात २३ टक्के, उत्तराखंडच्या तीन जलाशयात ४३ टक्के, मध्य प्रदेशच्या अकरा जलाशयात ५४ टक्के, छत्तीसगडच्या चार जलाशयात ४९ टक्के पाणी शिल्लक आहे. मागील दहा वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत उत्तर प्रदेशात २५ टक्के आणि छत्तीसगडमध्ये २२ टक्के कमी पाणीसाठा आहे.

पूर्व भारतात बिहारमध्ये पाणी टंचाई भीषण असून, बिहारमधील धरणात जेमतेम दहा टक्के पाणीसाठा आहे. मागील दहा वर्षांच्या तुलनेत बिहारमध्ये ५९ टक्के कमी पाणीसाठा आहे. नागालँडमध्ये १४ टक्के, पश्चिम बंगालमध्ये १९ टक्के कमी पाणीसाठा आहे.

केंद्रीय जल आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील ३२ प्रमुख धरणांत सद्यस्थितीला ४४ टक्के पाणीसाठा आहे. मागील दहा वर्षांच्या सरासरी पाणीसाठ्याचा विचार करता राज्यात अकरा टक्के कमी पाणीसाठा आहे. जायकवाडीत २४ टक्के, उजनीत शून्य टक्के, गिरणात ३२ टक्के, माणिकहोडमध्ये २३ टक्के, कण्हेरमध्ये ३५ टक्के, दारणा धरणात २८ टक्के, येलदरी धरणात ४१ पाणीसाठा आहे. प्रामुख्याने मराठवाड्यात पाणी टंचाई गंभीर झाली आहे. राज्यातील काही भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे टंचाईची तीव्रता कमी झाली आहे.

राज्यनिहाय धरणांतील पाणीसाठा (दहा वर्षांच्या सरासरीच्या तुलनेतील घट)

आंध्र प्रदेश : ६८ टक्के
बिहार : ५९ टक्के
तमिळनाडू : २७ टक्के
कर्नाटक : २६ टक्के
उत्तरप्रदेश : २५ टक्के
छत्तीसगड : २२ टक्के
नागालँड : १४ टक्के
महाराष्ट्र : ११ टक्के
तेलंगणा : १० टक्के

पावसाची कमतरता आणि भूजल स्तर दिवसेंदिवस खालावल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. बंगळूर शहराला १४५ कोटी लिटर पाणी कावेरी नदीतून मिळते आणि ६० कोटी लिटर पाणी बोअरवेल मधून मिळते. सध्या हे दोन्ही स्तर कोरडे पडले आहेत. यामुळे देशातील सर्वात मोठ्या आयटी हबमध्ये पाण्याचे मोल कळणार आहे. हवामान खात्याने देखील बंगळुरू मधील या स्थितीचा आढावा घेतला. कर्नाटक मधील या शहरात जास्त उष्ण होत आहे कारण तपमान वेगाने वाढत आहे. ही स्थिती केवळ एक झलक आहे.यापेक्षा भयावह स्थिती देशातील इतर राज्यांमध्ये दिसू शकते. विविध अहवालातून हे स्पष्ट झाले आहे की, भारत वेगाने पाण्याच्या दुर्भिक्षाकडे वेगाने वाटचाल करत आहे. हे एका दिवसांत दिसणारे संकट नाही.

जगाची १७ टक्के लोकसंख्या ही आपल्या देशात राहते. भारतात केवळ ४ टक्के शुद्ध पाण्याचे स्रोत आहेत. हे प्रमाण इतके विषम आहे की, त्यावरूनच आपल्याला परिस्थिती किती भीषण असू शकते याची कल्पना येईल.मागणी आणि पुरवठा हे प्रमाण पूर्णपणे व्यस्त आहे. नीती आयोगाने या अहवालानुसार पाहिले तर पाण्याच्या संकटाची भयावह लक्षणे लवकर दिसतील. देशात दरवर्षी स्वच्छ पाण्याच्या अभावी दोन लाख लोकांचा मृत्यू होतो. देशातील ७५ टक्के घरांमध्ये आजही पिण्याचे पाणी येत नाही. २०३० पर्यंत ४० टक्के लोकसंख्येकडे पिण्याचे पाणी नसेल. यातून एक गोष्ट नक्की की पाण्याचे संकट नुसते गंभीर नाही प्राणघातक ठरू शकते. सध्या पाण्यासाठी दिनाच्या रांगा हे केवळ या भीषण संकटाचा 'ट्रेलर' आहे. खरे संकट तर पुढील काही काळात दिसणार आहे. जेव्हा सर्व ऋतू बदलतील पाऊस अनियमित होईल आणि जागतिक तापमान वाढीचा जबदस्त फटका आपल्याला येत्या काही वर्षात बसणार आहे.

लोकसंसद

## भर उन्हाळ्यात पाऊस आणि गारपीट

गेले काही दिवस राज्याच्या हवामानात सातत्याने आणि वेगाने बदल होत असल्याने कधी उन्हाचा चटका, कधी गारठा, तर कधी अवकाळी पाऊस आणि गारपिट अशा विभिन्न प्रकारच्या हवामानाला सामोरे जावे लागत आहे. उन्हाच्या सततच्या तीव्र झळांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. कमाल तापमानाचा पारा अनेक ठिकाणी ३७ अंशांपार गेला आहे. काही ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून दुपारच्या सुमारास उन्हाची प्रचंड दाहकता तर सकाळच्या आणि रात्रीच्या वेळी काहीसा गारवा जाणवत आहे. कमाल आणि किमान तापमानातील मोठ्या फरकामुळे अनेकांना सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी, डोकेदुखी अशा आजारांचा त्रास सुरु झाला आहे. दुसरीकडे विदर्भात अवकाळी पाऊस आणि गारपिटीने जोरदार तडाखा दिल्यामुळे गहू, चणा, भात इत्यादी पिकांचे मोठे नुकसान झाले. पिकांची दैन्यावस्था बघून शेतकरी हवालदिल झाला आहे. निसर्गाचा समतोल बिघडल्यामुळे ऋतूचक्रावर परिणाम झाला असून भर उन्हाळ्यात पडणारा पाऊस आणि गारपीट हे त्याचे दृश्य परिणाम आहेत.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

मराठी साहित्यिक दिनविशेष

### एकवीस मार्च

**१८४३:-** भाषांतरकार आनंदराव सखाराम बर्वे यांचे निधन. बर्व्यांच्या नावावर 'हिंमतबहाद्दर' हे हॅल्मेटचे रुपांतर. तसेच 'ठगाची जबानी' हा कॅप्टन टेलरच्या 'कन्फेशन्स ऑफ अ ठग' या ग्रंथाचे भाषांतर आहे. **१८४७:-** विज्ञान आणि इतिहास अशा दोन्ही विषयांत लेखन करणारे लेखक बाळाजी प्रभाकर मोडक यांचा जन्म. 'रसायनशाला - पूर्वार्ध व उत्तरार्ध मिळून सृष्टीशाला किंवा पदार्थविज्ञानशाला - पूर्वार्ध व उत्तरार्ध' मिळून बावीसएक पुस्तके लिहून त्यांनी मराठीतील विज्ञान वाङ्मयाचे दालन समृध्द केले. तसेच 'दक्षिणेतील मुसलमानी राज्याचा इतिहास' त्यांनी लिहिला. तथापि त्यांची महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे भारतीय कालगणनेच्या तारीखवार निश्चितीसाठी त्यांनी केलेली जंत्री इतिहासाच्या अभ्यासकांसाठी उपकारक ठरली. 'मोडकजंत्री' या नावाने ती प्रसिध्द आहे. **१८९३:-** भाषांतरकार, वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीश आनंदराव सखाराम बर्वे यांचे निधन. 'हिंमत बहाूर' हे 'हॅम्लेट' च्या नाटकाचे रुपांतर व 'ठगाची जबानी' हे कॅ. टेलरच्या 'कन्फेशन ऑफ ए ठग' या पुस्तकाचे भाषांतर त्यांनी केले. **१९१३:-** 'मनोहर ग्रंथमाला' या प्रकाशन संस्थेचे संस्थापक, संपादक, लेखक मनोहर महादेव केळकर यांचा जन्म. ह्यांची 'अद्भूतातेही पैजा जिंके', 'उपायन' ह्या कथा तर 'उभविली जयांची स्वप्नमंदिरे भाग १,२', 'आचार्य विनोबा भावे' ही चरित्रात्मक, या पुस्तकांशिवाय 'गोठलेली क्षितीजे', 'चांदण्याच्या छायेत','स्वभावाला औषध नाही आणि दैवापुढे गती नाही' अशी साहित्य संपदा. याशिवाय 'वाङ्:मयशोध' हे मासिक त्यांनी मोठया चिकाटीने चालवले. **१९१४:-** दै.त्रिकाळचे वार्ताहर, दै.सकाळचे सहसंपादक भि. ना. ठाकोर यांचा जन्म. 'बातमीच्या शोधात ५० वर्ष', 'महाराष्ट्रातील क्रांतीकारकांचे (१९४२ च्या) कार्य' आणि 'शरद पवारांचा काँग्रेस प्रवेश व महाराष्ट्र' अशी ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे. **१९२८:-** साक्षेपी संपादक, उत्कृष्ट अनुवादक म्हणून ख्याती असलेल्या राम पटवर्धन यांचा जन्म. साक्षेपी आणि प्रयोगशीलता या दुर्मिळ गुणांमुळे पटवर्धन यांनी 'सत्यकथा' आणि 'मौज' या दर्जेदार वाङ्:मयीन नियतकालिकांचे संपादक म्हणून लौकिक मिळवला. पटवर्धन यांनी मार्जोरी किनन रॉलिंग्जच्या 'द इयरलिंग' या कादंबरीचा 'पाडस' हा केलेला अनुवादही उाम अनुवादाचा नमूना मानला जातो. 'योगदीपिका' हे एक त्यांचे आणखी एक अनुवादीत पुस्तके. जया दडकर, मारुती चित्तपल्ली, अनिल अवचट, नारायण सुर्वे, आशा बगे, सानिया, विलास सारंग, यशवंत पाठक, मीना प्रभू आदी मराठीतील अनेक नामवंत साहित्यिकांनी पुस्तके त्यांनी संपादित केली. 'मौज' मधून निवृत्त झाल्यानंतरही त्यांची अनेक पुस्तकांचे संपादन केले. अचला जोशी 'आश्रम नावाचे घर' हे त्यांनी संपादित केलेले अखेरचे पुस्तक. **१९३१:-** लेखक, कवी एकनाथ धांडे यांचा जन्म. 'प्रणय रेखा', 'नाते सर्वांशी', 'कविता आवडलेल्या' हे काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९२१:-** लेखक, प्रकाशक, स्वातंत्र्यसेनानी चंद्रकांत कल्याणदास काकोडकर यांचा जन्म. ह्यांच्या तब्बल साडेतीनशेहून अधिक कादंबऱ्या प्रसिध्द. काही कादंबऱ्यांवरुन चित्रपटही निघाले. तसेच काकोडकर या दिवाळी अंकाचे संपादन त्यांनी केले. रहस्यकथाकार असा नावलौकिकही संपादन केला. 'अखेरचा हा तुला दंडवत', 'अशी तुझी प्रीत', 'अमरप्रेम', 'उसना आवाज', 'गर्जा जयजयकार', 'प्रेमवरदान', 'लगीन करायचंय' हे नाटक इ. २३ नोव्हेंबर १९८८ रोजी काकोडकर यांचे निधन झाले. **१९४९:-** विविध वृत्तपत्रातून लेखन करणारे विजय बाळकृष्ण घोसाळकर यांचा जन्म. 'माया देशा' हे पुस्तक त्यांचे प्रकाशनाच्या मार्गावर आहे. **१९५०:-** लेखक, पेशाने चार्टर्ड अकाऊंटन्ट सुहास प्रभाकर तांबे यांचा जन्म.'ती येते', 'माझी गोष्ट', 'लिफ्ट', 'पुरुष' या त्यांच्या एकांकिका प्रकाशित झाल्या आहेत. **१९६७:-** आयुर्वेदाचे गाढे अभ्यासक आणि या विषयावरील एक लेखक गणपत पांडुरंग काळोखे यांचे निधन. 'विद्यार्थ्यांचे आरोग्य', 'मी निरोगी कसा राहील', 'दातांचे आरोग्य', 'स्त्रियांचे आरोग्य' 'शिशुपालन' अशी आरोग्यविषयक पुस्तके त्यांनी लिहिली. **१९७३:-** ज्येष्ठ श्रेष्ठ मराठी कोशकार यशवंत रामकृष्ण दाते यांचे निधन. ह्यांनी चि. ग. कर्वे यांच्या सहाय्याने 'महाराष्ट्र शब्दकोश' सात खंडात 'सुलभ विश्वकोश' सहा भागात, 'महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश', आणि 'शास्त्रीय परिभाषा कोश' याच जोडगोळीने निर्माण करुन कोश वाङ्:मयात मोलाची भर घातली. **१९७६:-** कवी, प्रा.नोमेश नारायण मेश्राम यांचा जन्म. 'वेदना आभाळ झाली', 'वादळांच्या कविता' आदी त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९८१:-** नाटककार वीर वामनराव जोशी यांचा जन्म. स्वातंत्र्य सेनानी असणाऱ्या वामनरावांनी 'राक्षसी महत्वाकांक्षा' आणि 'रणदुंदुभी' ही नाटके गाजली. याशिवाय 'हिंदुस्थान साप्ताहिक' त्यांनी चालवले होते. **१९८४:-** रविकिरण मंडळाचे एक संस्थापक, कवी श्रीधर रामकृष्ण रानडे यांचे निधन. 'माधुकरी', 'लेझीम', 'काळाच्या दाढेतून' या त्यांच्या कविता लक्षणीय ठरल्या. त्यांच्या स्फूटकविता 'श्री मनोरमा' या संग्रहात समाविष्ट आहेत. **१९९०:-** साहित्यिक प. पू. सद्गुरु योगिराज श्री मामासाहेब देशपांडे यांचे निधन. संतसाहित्याचे व विशेषत्वाने 'श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांच्या श्रीज्ञानेश्वरी', 'श्रीहरीपाठ', 'अभंगगाथा' इत्यादी सर्व वाङ्मयाचे साधकांसाठी अनुभूतीच्या अंगाने केलेले सुबोध निरुपण.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ मार्च

१) श्री. श्रीकांत दामोदर पाटील
कुरूळ, अलिबाग, २१-३-१९४३

२) श्री. हेरंभ शंकर गोगटे
चोंढी, अलिबाग, २१-३-१९५२

३) श्रीम. किरण कृष्णा खराडे
चेंढरे, अलिबाग, २१-३-१९५६

४) श्री. विलास काशिनाथ म्हात्रे
अलिबाग, २१-३-२०२३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# रस्त्यावर कचऱ्याचे साम्राज्य

**। नेरळ । वार्ताहर ।**

ममदापुर ग्रामपंचायतीच्या हद्दीत नेरळ-कल्याण स्त्यावर मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढिग टाकण्यात येत आहेत. त्यामुळे नेरळ विद्या मंदिर शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना नाकावर रुमाल ठेवून जावे लागत आहे. मात्र, ममदापूर ग्रामपंचायत त्या ठिकाणी बेकायदेशीर रित्या कचरा टाकणाऱ्यांवर काहीच कारवाई करीत नाही. त्यामुळे या भागात दोन ठिकाणी नवीन कचरा डेपो तयार झाले आहेत.

ममदापुर ग्रामपंचायतीमधील नेरळ विद्यामंदिर परिसर हा नव्याने वाढत आहे. त्या भागात ग्रामपंचायतीकडून केवळ आठवड्यातून एकदाच घंटागाडी कचरा उचलण्यासाठी जाते. त्यामुळे या भागात जागोजागी कचरा पडून असल्याचे दिसून येत आहे. यामुळे नेरळ-कल्याण रस्त्याच्या बाजूला दोन ठिकाणी प्लास्टिक पिशवीमधून आणलेला कचरा टाकतात.



त्यामुळे ममदापुर ग्रामपंचायत हद्दीत नवीन कचरा डेपो निर्माण झाले असून परिसरात दुर्गंधी निर्माण झाली आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाने नव्याने घंटागाडी खरेदी करून नेरळ-कल्याण रस्त्यावर टाकण्यात येत असलेला कचरा दररोज उचलण्याची गरज निर्माण झाली आहे. त्याच रस्त्याने दररोज किमान दोन हजार विद्यार्थी हे नेरळ विद्या मंदिर शाळा, कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय येथे शिक्षण घेण्यासाठी जात असतात. त्यामुळे ममदापूर ग्रामपंचायतीने रस्त्याच्या बाजूला टाकण्यात आलेला कचरा उचलण्यात यावा. तसेच, रस्त्यावर बेकायदा कचरा टाकणाऱ्या ग्रामस्थांवर ग्रामपंचायतीने कारवाई करावी, अशी मागणी रस्त्याने जाणारे रहिवाशी करीत आहेत.

# वैजनाथ केंद्रशाळेत सामाजिक उपक्रम

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मनस्वी गृप संस्था, वैजनाथ केंद्रशाळा आणि वैजनाथ ग्रामपंचायत माध्यमातून आदिवासी महिलांचे व्यक्तिमत्व विकासास ज्ञान प्रबोधनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिलांना साडी आणि शिधा वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाला शेकडो आदिवासी महिला सहभागी झाल्या होत्या.

यावेळी जि.प.सदस्या आशा झिपुर यांनी महिलांना साहित्य वाटप केले. संतोष सावंत यांनी या कार्यक्रमाबद्दल केंद्र शाळा वैजनाथचे आभार मानले. अमिता तावडे यांनी प्रबोधन केले. सुजित धावडे, माधव पाठक, मंगेश साळखे यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमात सविता बोराडे, नारायण सोनवणे, बाळासाहेब ढाकणे, अशोक पाखरे, अनंत थोरवे यांनी महिलांना मार्गदर्शन केले.




# हापूस आंबा रायगडात दाखल



**। गोवे-कोलाड । वार्ताहर ।**

फळांचा राजा अशी ओळख असणारा हापूस आंबा रायगडच्या विविध तालुक्यातील बाजारपेठेत दाखल झाला आहे. हापूस आंबा बाजारपेठेत विक्रीसाठी येण्यासाठी एप्रिल महिना उजाडतो. परंतु, या हंगामातील हापूस आंबा मुंबईमध्ये जानेवारी महिन्यात दाखल झाला. याची किंमत एका डझनला ३ हजार ८५० रुपये म्हणजेच एक आंबा ३२१ रुपये किंमतीचा होता. परंतु, हाच हापूस आंबा अता एका डझनला १ हजार २०० रुपये म्हणजेच एक हापूस आंबा १०० रुपये किंमतीला मिळत आहे. मार्च महिन्याच्या शेवटी याची आवक वाढणार असल्यामुळे हा आंबा सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला परवडेल इतक्या दरात उपलब्ध होईल, असे आंबा विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

# कुपोषण निर्मूलनासाठी जनजागृती मोहीम

**। नेरळ । वार्ताहर ।**

तालुक्यात विकासाचे वारे वाहू लागले असले तरी कर्जत तालुका आजही कुपोषणाच्या विषयी संवेदनशील समजला जातो. या तालुक्यातील कुपोषण निर्मुलनासाठी युनायटेड वे ही स्वयंसेवी संस्था गेली दहा वर्षे काम करीत आहे. कुपोषण निर्मूलनासाठी या संस्थेकडून अंगणवाडीत येणाऱ्या तीन ते चार हजार बालकांना दरवर्षी पोषण आहार दिला जातो. आता या संस्थेने कुपोषणाबाबत जनजागृती करण्यासाठी पथनाट्याद्वारे जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. कर्जत तालुक्याच्या आदिवासी आणि ग्रामीण भागात असलेल्या अंगणवाडी केंद्रामध्ये युनायटेड वे मुंबई अंतर्गत स्वयंसिद्धा प्रकल्प राबविला जात आहे. या संस्थेच्या वतीने पथनाट्यातून कुपोषण मुक्ती विषयक जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे.




या उपक्रमासाठी युनायटेड वे मुंबईचे रेखा जाधव, कल्पेश अगिवले, प्रवीण खंडवी, अर्चना पाटील, प्रतिक्षा ठोंबरे, वासंती बडेकर, तपस्वी नंदकुमार गोंधळी यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# माणगावात सह्याद्री बझारची नवीन शाखा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सहकार क्षेत्रात रायगड जिल्ह्यातील नामांकित संस्था सह्याद्री प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था मर्यादित माणगाव (सह्याद्री बझार) या संस्थेची नवीन शाखा माणगावात निजामपूर रोड मार्गावर दि. १ एप्रिलपासून सुरु होत असल्याची माहिती ॲड. राजीव साबळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

माणगावात घरपोच मालाची सेवा, उच्च प्रतीचा निवडक व स्वच्छ माल, योग्य वजन, माफक दर, आकर्षक मांडणी, प्रामाणिक सेवा आणि ३३ वर्षाची परंपरा जपून निर्माण केलेला ग्राहकांचा विश्वास ही या संस्थेची खास वैशिष्ट्ये आहेत. या संस्थेचे संस्थापक स्व. अशोक साबळे असून संस्थापक अध्यक्ष संजय साबळे आहेत. संस्थेची उर्वरित कार्यकारणी नव्याने निवडण्यात आली असून त्यामध्ये संस्थेच्या चेअरमनपदी ॲड. राजीव साबळे, संचालक नितीन बामगुडे, रत्नाकर उभारे, शैलेश भोनकर, गजानन मोरे, समीर साबळे, सुनील पवार, विरेश येरुणकर, रवींद्र ना. मोरे, संचालिका संगीता उतेकर, श्वेता देशमुख अशी निवडण्यात आली आहे.

या संस्थेबद्दल पत्रकार परिषदेत बोलताना ॲड. राजीव साबळे म्हणाले की, सह्याद्री बझारची नवीन शाखा १ एप्रिल रोजी माणगाव निजामपूर रस्त्यावर उतेखोलवाडी गावच्या कॉर्नरवर प्रशस्त जागेत सुरु करीत आहोत. या शाखेमुळे या भागातील उतेखोलवाडी गाव, विरेश्वर नगर, महाराणा प्रतापनगर, क्रांती नगर, दत्तनगर, एकतानगर, साईनगर, वाकडाईनगर, आदिवासी वाडी येथील नागरिकांना जवळच्या अंतरावर दैनंदिन लागणाऱ्या घरगुती वस्तू मिळणार आहेत. या सर्व भागातील नागरिकांचा विचार करीत संस्थेने याठिकाणी संस्थेची नविन शाखा सुरु करण्याचे ठरवून लवकरच ग्राहकांच्या सेवेकरिता शाखा सज्ज होणार असल्याचे सांगितले.

# सत्याग्रह दिनानिमित्त नाश्ता व पाण्याची व्यवस्था

**। नागोठणे । वार्ताहर ।**

जिल्ह्यातील महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह दि. १९ व २० मार्च, १९२७ रोजी बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला होता. दरवर्षी २० मार्च रोजी सत्याग्रह दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून महाड येथे लाखोंच्या संख्येने भिमसैनिक येत असतात. त्यामुळेच मुंबईहून महाड येथे जाणाऱ्या समाज बांधवांसाठी नागोठणे विभाग बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ३ यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे येथील हायवे नाका येथे सकाळी नाश्ता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. अनेक समाज बांधवांनी या ठिकाणी थांबून नाश्त्याचा आस्वाद घेत पुढच्या प्रवासाला सुरुवात केली.



यावेळी एस. गायकवाड, किसन शिर्के, प्रभाकर ओव्हाळ, निलेश शेलार, विकास जाधव, विलास कांबळे, संतोष गायकवाड, भगवान बिनेदार, बबन झेंडे, प्रकाश कांबळे, रमेश गायकवाड, हेमंत जाधव, सुरेश कांबळे, जगदीश वाघमारे, संदिप मोहिते, सुदिन शिर्के, देवराम कांबळे, दिपक दाभाडे, अल्पेश शेलार, सुरेश कांबळे, मनोहर शेलार उपस्थित होते.

# विठ्ठल रूक्मिणी मंदिराचा वर्धापनदिन

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिराचा आठवा वर्धापनदिन सोहळा सोमवारी (दि.१८) मोठ्या उत्साहात व धार्मिकतेच्या वातावरणात संपन्न झाला.

स्वा.सु.अलिबागकर, धोंडू कोलाटकर व गोपाळ वाजे यांच्या कृपार्शिर्वादाने व दत्तू महाराज कोलाटकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या वर्धापनदिन सोहळ्याप्रसंगी देवतांचे अभिषेक व पूजाविधी, कलश स्थापना, ध्वजारोहण व महाआरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या ९ व १२ व्या अध्यायाचे पारायण, सामुदायिक हरिपाठ, सायं. ७ ते ९ रूपेश शेळके यांची हरिकिर्तनरुपी सेवा, तद्नंतर महाप्रसाद, महाओजन व हरिजागर आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.



या सर्व कार्यक्रमांचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तळवली तर्फे अष्टमी व जय हनुमान क्रीडा मंडळ तळवली यांनी मोलाचे सहकार्य केले.

# अडणाले येथे घराला आग

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यातील अडणाले येथे घराला आग लागण्याची घटना घडली आहे. या आगीत संपूर्ण घर जळून खाक झाल्याची माहिती मिळाली आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, अडणाले येथील सखाराम आंबेकर यांच्या घरी रात्री बारा वाजताच्या दरम्यान शॉक सर्किटमुळे आग लागली. सुदैवाने सखाराम आंबेकर हे सोलमवाडी येथे राहायला गेले असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेची माहिती मिळताच महावितरण विभाग व पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच, गावकऱ्यांनी आपल्या परीने आग विझविण्याचा प्रयत्न केला. प्रचंड प्रमाणात आग लागल्याने ती विझविणे ग्रामस्थांनी शक्य झाले नाही. अग्निशमन गाडीच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. मात्र, मोठ्या प्रमाणावर आग लागल्याने घरातील सर्व साहित्य आगीत जळून खाक झाले आहे.

# तळा येथे माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

**। तळा । वार्ताहर ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २२-२३ या शैक्षणिक वर्षातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.



याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस.यादव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाच्या जडणघडणीत तसेच वाटचालीत महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत असून त्यांनी महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. या मेळावा आयोजनामुळेएकनवीनदिशाआम्हाला मिळणार असून महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेमार्फत विविध चांगले उपक्रम राबविले जातील, असे मत व्यक्त केले.

माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना आमच्या व्यक्तिगत विकासामध्ये महाविद्यालयाचे स्थान महत्वाचे आहे. महाविद्यालयातील जुन्या आठवणींना ऊजाला देत आम्ही महाविद्यालयामुळे कसे घडत गेलो हे सांगितले. मनोज वाढवळ यांनी माजी विद्यार्थी संघटना स्थापन करून संघटनेच्या उद्दिष्टांविषयी थोडक्यात माहिती दिली.

# पाली-खोपोली मार्गावर झाड कोसळले

## मोटारसायकलस्वार गंभीर जखमी



**। पाली । वार्ताहर ।**

पाली-खोपोली राज्य महामार्गावर खुरावले फाटा एचपी पेट्रोल पंपासमोरील एका मोठ्या वडाच्या झाडाला सोमवारी (दि.१८) आग लागली होती. त्यामुळे रात्री हे झाड रस्त्यावर कोसळले. या झाडावर धडकून मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शॉर्टसर्किटमुळे दुपारी या झाडाला आग लागली होती. येथील स्थानिकांनी, पेट्रोलपंप व्यवस्थापक संदीप जाधव व कर्मचारी, नर्सरीतील कर्मचारी विजय दिवा, अलका दिवा, तेजस दिवा, सुजल दिवा, प्रदीप यादव, अतिष सागळे व शुभम गुप्ता यांनी मोटारपंप लावून पाण्याने ही आग विझवली. मात्र, सायंकाळी पुन्हा या झाडाने पेट घेतला.

रात्री या आगीमुळे झाडाचा बराचसा भाग भर रस्त्यात खाली कोसळला. यावेळी या झाडाला ठोकून किंवा झाड अंगावर पडून भेरव येथील विजय सागळे हे मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

# नागरिकांनी हक्क, अधिकारांविषयी जागरूक राहावे

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

तळागाळातील लोकांना कायदेविषयक ज्ञान प्राप्त व्हावे. त्यांच्या ज्ञानात भर पडावी आणि त्यांच्या विचारांच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत, तरच ते सजग नागरिक बनतील. मूलभूत गरजा पूर्ण करताना त्यांना भेडसावणाऱ्या अनेक समस्या आणि कायद्याच्या बाबतीत निर्माण होणारे पेचप्रसंग या संदर्भात लोकांना माहिती मिळावी. नागरिकांना कायद्याची जाणीव करून देताना त्यांना सजग बनवण्यासाठी व आपल्या हक्क आणि कर्तव्य संदर्भात जागृतता निर्माण करण्यासाठी कायदेविषयक ज्ञान हे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सिद्धयोग लॉ कॉलेज खेडचे प्राध्यापक ॲड.दिलीप चव्हाण यांनी केले.

खेड तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय शाळा कळंबणी बुद्रुक या ठिकाणी अनिल आंजर्लेकर, भगवान साळुंखे यांच्या माध्यमातून कायदेविषयक मार्गदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लॉ कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाला भगवान साळुंखे, देवघरकर, रामचंद्र येसरे, नरसिंह सुतार, दिलीप गावडे उपस्थित होते.

प्रा. ॲड चव्हाण म्हणाले, स्पर्धेच्या युगात कायद्याच्या काही बाजू समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. नेहमीचे जीवन जगताना अनेक वेळा कायद्याच्या चौकटीतून आपल्याला जावे लागते. अशावेळी आपल्याला कायद्याचे ज्ञान नसेल तर आपली फसगत होते आणि हीच फसगत होऊ नये यासाठीच सिद्धयोग लॉ कॉलेजने वेगळा उपक्रम हाती घेतला आहे. दर शनिवारी सकाळी ११ ते ४ या वेळेमध्ये मोफत कायदेविषयक सल्ला दिला जातो. नागरिकांना कायद्याच्या बाबतीत सजग बनवण्यासाठी हा उपक्रम कॉलेजच्या प्राचार्या प्रीती बोंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजने सुरू केला आहे.

या शिबिरात अशोक कांबळे या विद्यार्थ्यांने ग्रामपंचायत हा विषय घेत त्याच्यावरती कायदेविषयक गोष्टी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विद्यार्थिनी सायली जांभळे हिने ग्राहक संरक्षण कायदा या संदर्भात माहिती दिली. ऋतुजा निमदे हिने महिला विषयक कायदे आणि समस्यांचे निराकरण केले.

# वेगवान वाऱ्यांनी मच्छीमार हवालदिल

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

गेले काही दिवस समुद्रात वेगवान सुटलेल्या वाऱ्यांमुळे मच्छीमारीला ब्रेक लागला आहे. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या काही बोटींचे नुकसानही होत आहे. त्यामुळे अनेक मच्छीमार नौका माघारी फिरत आहेत. त्यामध्ये मच्छीमारांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. मासळी कमी असल्यामुळे दरही वधारलेले आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक मच्छीमार समुद्रामध्ये बारा नॉटीकल मैलावर मासेमारी करण्याकरिता नौका घेऊन जातात. साधारणतः मे महिन्यापर्यंत मासेमारीची प्रक्रिया संपते



आणि मच्छीमार नौका किनाऱ्यावर घेतात. चालू आठवड्यात कोकण किनारपट्टीवर सुटलेल्या वेगवान वाऱ्यामुळे मासेमारी न करताच मच्छीमार किनाऱ्यावर येत आहेत. सलग तीन दिवस हा प्रकार मच्छीमारांना सहन करावा लागत आहे. पाण्याला प्रचंड करंट असल्यामुळे मासेमारीसाठी जाळी टाकून उभे राहणेही शक्य होत नाही. वेगवान वाऱ्यामुळे नौकांचे नुकसान होत आहे. जाळी फाटत असून इंजिनमध्येही बिघाड होत आहे. नुकसान होण्यापेक्षा मच्छीमार नौका नांगर टाकुन किनाऱ्यावर उभ्या ठेवणे पसंत करतात. बोटींसाठी लागणारा डिझेल व खलाशांचा खर्च सुटत नसल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे मच्छीमारांचे मत आहे. ही परिस्थिती वारंवार उद्‌भवल्यामुळे जिल्ह्यातील मच्छीमार हवालदिल झाले आहेत. चार दिवसांपूर्वी कासारवेली येथून काही मच्छिमार मासेमारीसाठी गेले होते. त्यांना खर्च मिळेल एवढीही मासळी मिळाली नाही.



# शेतकऱ्यांना यांत्रिकीकरणातून अनुदान

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीकडे वळवून पारंपरिक भातपिकांबरोबरच अन्य पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना तालुका कृषी खात्याकडून राबवण्यात येत आहेत. तालुक्यातील २८ गावातील ३० शेतकऱ्यांनी राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेतून शेतीशी निगडित उपकरणांची खरेदी केली. यातून शासनाने त्यांच्या खात्यात ९ लाखाहून अधिक अनुदान जमा केले आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेती उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन मिळत आहे.

तालुक्यातील १८ हजाराहून अधिक शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान निधी व नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळत आहे. अन्य विविध योजना देखील केंद्र व राज्य शासनाकडून राबवल्या जात आहेत. यातील राज्य शासनाच्या कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित मुख्य उपकरणांच्या खरेदीवर ८० कृषी यांत्रिकीकरण योजनेचा लाभ घ्यावा, कमी वेळेत व कमी श्रमात अधिक पिके घेण्यासाठी व उत्पादन वाढवण्यासाठी शेतीविषयक उपकरणे खरेदीसाठी शासनाकडून अनुदान मिळत आहे. तालुक्यातील डोंगराळ व सपाटी भागातील शेतकऱ्यांना पॉवरटिलर, पॉवर व्हीडर, ग्रास कटर, ब्रश कटर, मोटर पंप, इलेक्ट्रीक मोटर, पॉवर स्पेअर आदी उपकरणे उपयुक्त ठरतात. मात्र, महागाईमुळे शेतकऱ्यांकडून ही उपकरणे खरेदी होत नसल्याने शेतीचे उत्पादन घटत चालले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कृषी उपकरण खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान प्राप्त करून दिले आहे.

निवडक

## मोफत आरोग्य शिबीर

**पाली/बेणसे :** श्रीगांव येथ सक्षम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने दि मदर तेरेसा मेमोरियल सोशल वेल्फअर ट्रस्ट आणी टीसीपीएल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरात सक्षम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या सभासदांनी शिस्तबद्ध पद्धतीने शिबिराचे कामकाज पार पाडले. लहु म्हात्रे, अरुण पाटील, कमलाकर पाटील, शंकर शितोळे, जितेश्री पाटील, काशीनाथ पाटील, रिटा जॉय आदी उपस्थित होते.

## फार्महाऊसमध्ये चोरी

**कर्जत :** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत सोमवारी (दि.११) रोजी रात्री दहा वाजताच्या सुमारास आरवंद-कर्जत येथील फिर्यादीच्या फार्महाऊसचे अज्ञात चोरट्याने खिडकीचे प्लायवुड तोडून त्यावाटे आत प्रवेश केला. तेथील कपाट फोडून त्यातील एकूण ७३ हजार ५८० रुपये किमतीचा माल चोरट्याने चोरुन नेला. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार समीर भोईर हे करीत आहेत.

## चाळीस हजाराची फसवणूक

**माणगाव :** माणगावात मंगळवारी (दि.१९) दुपारी अडीचच्या सुमारास चाच येथील महिलेला तुमच्या मुलाने निजामपुर येथील पतपेढीतून कर्ज घेतले असून त्याचे वसुलीकरीता आलो असल्याचे आरोपीने सांगितले. महिला फिर्यादीकडील ४० हजार रूपये किंमतीचा १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा लक्ष्मीहार घेऊन पतपेढीत जमा करून कर्ज भरून टाकतो असे सांगून लक्ष्मीहार घेऊन फिर्यादीची फसवणूक केली. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दिड लाखाचे दागिने चोरीला

**खोपोली :** पालीफाटा सुमन हॉटेलजवळ महिला फिर्यादी बुधवारी (दि.१३) रोजी संध्याकाळी आठ वाजण्याच्या सुमारास जेवण करण्यासाठी थांबली होती. त्यावेळी अज्ञात चोरट्याने एकूण एक लाख पन्नास हजार चारशे पच्च्याण्णव रुपये किमतीचे सोन्याचे दागिने महिलेच्या बॅगेतून चोरून नेले. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई व्हरांबळे व त्यांचे सहकारी करीत आहेत.

## उपोषणाला स्थगिती

**कर्जत :** कर्जतमधील उल्हास नदी पात्रातील अनधिकृत भराव आणि बांधकाम बंद करून काढून टाकावे यासाठी मंगळवारी (दि. १९) किसान मोर्चा आणि शेतकरी-गावकरी लोकमान्य टिळक चौक कर्जत येथे आमरण उपोषणाला बसणार होते. परंतु, जिल्हाधिकारी यांनी १६ मार्च पासून जिल्ह्यात जमावबंदी, आंदोलने, मोर्चे, उपोषण यावर ६ जूनपर्यंत बंदी घातली आहे. त्यामुळे हे उपोषण स्थगित करण्यात आले आहे, अशी महिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

# पारंपारीक कला जिवंत ठेवण्यासाठी तरूणांची धडपड

**। पाली । वार्ताहर ।**
**बाल्या व माळी नृत्य हा ग्रामीण पारंपारीक नृत्य प्रकार बंद होण्याच्या मार्गावर आहेत. मात्र, पूर्वजांकडून मिळालेली ही पारंपारीक नृत्याची कला जिवंत ठेवण्यासाठी जिल्ह्यातील विविध ठिकाणी होळीला व इतर सणांना बाल्या व माळी नृत्य सादर केले जाते. शिवाय वेगवेगळी सोंग घेऊन लहान मुले धम्माल उडवत असतात. काही ठिकाणी होळीच्या दोन-तीन दिवस आधी होळीसमोर महिला पारंपरिक गाणी म्हणत असतात. ही पारंपारीक लोककला जिवंत ठेवण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. विशेषतः गावखेड्यात ही परंपरा टिकून आहे.**



### होळीला बाल्या व माळी नृत्याची धूम

पुणे-मुंबई आदी शहरांतून शिमगा व होळीसाठी आलेले चाकरमानी या परंपरेचा आनंद व सहभागही घेत असतात. रायगड जिल्ह्यात शिमगा, होळी, गणपती, नवरात्र, दसरा व दिवाळी अशा विविध सणांमध्ये गावा-खेड्यात पारंपारीक बाल्या व माळी नृत्य ही नाच मंडळी अनेक वर्षापासून आपली पारंपारीक कला सादर करत आहेत. नाचण्याचा विशिष्ट व आकर्षक ठेका, लय, कपड्यांचा वेगळेपणा आणि काळजाला भिडणारी पारंपारीक, प्रबोधनात्मक गाणी व संगीत यामुळे अनेक वर्षांपासून बाल्या व माळी नृत्य खुप लोकप्रिय होते. मात्र, आधुनिकतेच्या युगात समाजामध्ये बाल्या आणि माळी नृत्याकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलत गेला. तरुण पिढीने याकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे ही लोककला आता लोप पावत चालली आहे. आपल्या पुर्वजांची कला टिकावी, तिचे जतन व्हावे यासाठी पेण तालुक्यातील दुरशेत गावातील सुशिक्षीत तरुण मागील दहा वर्षांपासून स्वतः कला सादर करुन जोपासत आहेत. यातील अनेक तरुण पदवीधर आहेत तर कोणी इंजिनियर आहेत.

### सोंग आणि गाणी

**होळीला गावागावांत सोंग काढले जाते. निखळ मनोरंजन करणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. यातून गावातील एकोपा देखील साधला जातो. लहान मुले यामध्ये सहभागी होतात. सध्या बाजारात वेगवेगळे मुखवटे व कपडे उपलब्ध असल्याने ती परिधान करून सोंग काढले जाते. काही गावातील महिला होळी जवळ येऊन गाणी म्हणतात. त्याला काही ठिकाणी मालणी असे म्हणतात. ही गाणी विशेष तालासुरात म्हटली जातात. स्थानिक भाषा व परिस्थितीचा यामध्ये समावेश व उल्लेख असतो.**

> **आपल्या भावी पिढीला ही कला समजावी व त्यांनी देखील ही पारंपरिक कला अधिक समृद्ध करावी यासाठी आपली वैयक्तिक जबाबदारी म्हणून मागील १५ वर्षांपासून बाल्या व माळी नृत्य ही कला जतन करत आहोत. गावातील सर्व ग्रामस्त आम्हाला प्रोत्साहन देऊन सहकार्य करतात. पारंपारीक कला टिकावी यासाठी आमचा हा छोटासा प्रयत्न आहे.**
> **- समाधान म्हात्रे, तरुण कलाकार, दुरशेत, पेण**



# स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**
शाळेय शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना मतदानांचे महत्व कळावे या उद्दात विचारांतून रायगड जिल्हा परिषद शाळा वडगांव येथील मुख्याध्यापक सुभाष राठोड आणी शिक्षक यांच्या माध्यमातून स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती अभियान राबविण्यांत आले. मतदानाच्या दिवशी सुट्टी म्हणून बाहेर फिरायला न जाता, घरी न थांबता मतदान करावे, अशी भावनिक साद देण्यात आली. यावेळी गावातील विद्यार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेटी देऊन कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्यात आला.

शासनाच्या या अभियानात तालुक्यात सर्वप्रथम अभियान राबवून शासनाच्या धोरणाच्या अंमलबजावणीत तत्परता दाखविल्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. यावेळी सरस्वती कवाद, वैजनाथ जाधव, निकिता गडगे व साक्षी जांभूळकर यांनी मेहनत घेतली. गावातील जेष्ठ नागरिक, पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या अभियानाचे कौतुक केले.

# तहसिल कार्यालयात कामांची रखडपट्टी

## ■ लोकसभा निवडणुकीत अधिकारी व्यस्त

**। चिरनेर । वार्ताहर ।**
देशात लोकसभा निवडणुकीचे बिगुल १६ मार्च पासून वाजले आहे. त्यामुळे उरण तहसिल कार्यालयात विविध प्रकारचे दाखले, रेशनकार्ड व अन्य महसूल संबंधित कामासाठी येणाऱ्या तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक, वयोवृद्ध महिलांसह शालेय विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांची रखडपट्टी होत आहे. कामाविना परत जावे लागत असल्याने याआधी रखडपट्टीत राहिलेली कामे सध्या ठप्प झाल्याचे चित्र उरण तहसिल कार्यालयात दिसत आहे.

केवळ शिपाई पदावर कार्यरत असलेले एक-दोन कर्मचारी तहसिल कार्यालयात कामासाठी जाणाऱ्या तालुक्यातील नागरिकांना सर्व अधिकारी व कर्मचारी लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी जासई येथील स्वर्गीय दि. बा. पाटील सभागृह येथे रवाना करण्यात आल्याचे उत्तर देत आहेत. लोकसभा मतदानानंतर दोन महिन्यांनी तुमच्या कामासाठी या, असे सांगत आहेत. यामुळे सर्वांची कामे रखडली असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

> सध्या होऊ घातल्या लोकसभा निवडणुकीच्या काळात रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशाप्रमाणे आमचे बहुतांशी अधिकारी व कर्मचारी निवडणुकीच्या कामात व्यस्त आहेत. मात्र, तालुक्यातील नागरिकांची कामे निवडणूक काळात थांबू नयेत, यासाठी लागणारे अधिकारी व कर्मचारी दोन दिवसात सज्ज ठेवण्यात येतील.
> - डॉ. उद्धव कदम, तहसीलदार, उरण



# सेवानिवृत्त कामगारांचा सन्मान

**। मुंबई । वार्ताहर ।**
पुणे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा थोरांदळे येथे शालेय विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम दि. १८ मार्च रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात शालेय व्यवस्थापन समिती व समस्त ग्रामस्थ थोरांदळे यांच्यावतीने 'सन्मान भूमिपुत्रांचा' हा अनोखा उपक्रम राबविला गेला. यामध्ये थोरांदळे येथील परंतु मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये सेवा करून निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला जे. डी. टेमगिरे, संदीप टेमगिरे, बाळासाहेब टेम गिरे, सिताराम गुंड, हरिभाऊ गुंड, केंगले गुरुजी, नितीन टेमगिरे व सर्व सदस्य उपस्थित होते.

# तळा येथे निपुण उत्सव साजरा

**। तळा । वार्ताहर ।**
रा.जि.प.शिक्षण विभागाच्या आदेशाप्रमाणे तळा पंचायत समिती शिक्षण विभागाने निपुण भारत अभियानांतर्गत मंगळवारी (दि.१९) कन्याशाळा तळा सभागृहात निपुण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक केंद्रातून निपुण भारत अंतर्गत भाषा, गणित, शैक्षणीक साहित्य तसेचनाविन्यपूर्णउपक्रमसादरीकरण करणे तसेच शिक्षकांसाठी निबंध स्पर्धांचे आयोजन करुन 'माझी निपुण शाळा' व 'असे आम्ही निपुण झालो' हे निबंधाचे विषय होते.




शिक्षकांना निबंधाच्या विषयातून व शैक्षणिक साहित्य निर्मितीचे प्रगतीमधून निबंध स्पर्धा घेऊन मितल सुहास वावेकर प्रथम, भुषण गंगाधर जाधव द्वितीय तर चेतन जगताप याला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेत भाऊसाहेब शेकू पवार प्रथम, पुनम विजय खैरनार द्वितीय, मितल सुहास वावेकर हिला तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

याप्रसंगी सुरेखा तांबट, दिपक ठाकूर, सचिन म्हात्रे, सचीन खंडागळे, गौतम मनवर, सुधीर जाधव, लियाकत राऊत उपस्थित होते.

# टर्मिनल कामगारांना कायमस्वरूपी करावे

**। उरण । प्रतिनिधी ।**
मर्स्क या जागतिक कंपनीची वार्षिक सभा १४ मार्च रोजी कोपणहेगन डेंन्मार्क येथे संपन्न झाली. या वार्षिक सभेसाठी संघटनेचे कार्याध्यक्ष पि.के. रमण यांना मर्स्क स्टेअरिंग ग्रुपचे निमंत्रण होते. पोर्टमध्ये जे कंत्राटी कामगार कायमस्वरूपी काम करतात त्यांना कंपनीच्या कायमस्वरूपी कामगारांप्रमाणे पगार व सोई सुविधा मिळाल्या पाहिजे, अशी मागणी मर्स्ककंपनीचे ग्लोबल हेड मिस्टर रुड व्हन डर वेल यांच्याकडे केली. या मागणीवर या बहुराष्ट्रीय



संघाबरोबर चर्चा करण्यात आली व सकारात्मक तोडगा निघेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

संघटनेचे कार्याध्यक्ष पि.के. रमण यांनी केलेल्या मागणीला यश आले तर पोर्ट मधील सर्व कंत्राटी कामगार कायमस्वरूपी होतील.

# कंत्राटी कामगारांना न्याय देणार



## आभा शुक्ला यांचे प्रतिपादन

**। उरण । प्रतिनिधी ।**
राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी वीज कंत्राटी कामगारांच्या शिष्ट मंडळासोबत मंगळवारी (दि.१९) त्यांच्या दालनात सभा घेतली. राज्यातील महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील कंत्राटी कामगारांनी ५ मार्च ते ९ मार्च बेमुदत काम बंद आंदोलन केले होते. या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली.

या सभेत समितीचे राज्य संघटक सचिन मेंगाळे, उमेश आनेराव, नचिकेत मोरे, कमलेश राणे, राजन भानुशाली, कृष्णा भोयर उपस्थित होते. तिन्ही वीज कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांसोबत पुन्हा एक बैठक घेण्यात येईल. त्यावेळी पगार वाढ व अन्य महत्वपूर्ण मुद्यांवर चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

# रेल्वे कामगारांचा मागण्यांसाठी मोर्चा

**। मुंबई । प्रतिनिधी।**
भारतीय सेंट्रल रेल्वेमधील नॅशनल रेल्वे मजदुर युनियनचे महामंत्री कॉ. वेणू नायर यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे कामगारांनी विविध मागण्यांसाठी मुंबई मंडळ कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

नवीन पेन्शन योजना रद्द करा, रेल्वे वसाहती दुरुस्त करा, हॉस्पिटलमध्ये चांगल्या सुख सुविधा व तीन महिन्यांसाठी मोफत औषधे मिळावे, २५ हजार रिकाम्या जागा त्वरित भराव्यात, काळा कानून आणू नये व इतर महत्त्वांच्या मागण्यांसाठी मंगळवारी (दि.१९) छत्रपती शिवाजी टर्मिनल येथील १८ नंबरच्या प्लॅटफॉर्मवरून मोर्चा नेऊन मुंबई मंडळ कार्यालयावर प्रचंड निदर्शने केली.



याप्रसंगी वेणू पी. नायर यांनी निदर्शकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, नवीन पेन्शन योजना अन्यायकारक असून, जुन्या पेन्शन योजनेनुसार कामगारांना मूळ पगाराच्या अर्धी पेन्शन मिळाली पाहिजे. कामगार भरती न झाल्यामुळे आहे त्या कामगारांवरती कामाचा ताण वाढतो, तरी रिकाम्या असलेल्या २५ हजार जागा त्वरित भराव्यात. घरभाडे भत्ता ३० टक्के घेता तर नादुरुस्त रेल्वे वसाहती ताबडतोब दुरुस्त कराव्यात, रेल्वे हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी कामगारांना चांगली वागणूक द्यावी, ५० टक्के महागाई भत्ता मूळ पगारात समाविष्ट करावा. अश्या अनेक रेल्वे कामगारांच्या प्रमुख मागण्या आहेत.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रेस्टॉरंट मनेजर २.वेटर ३.साऊथ इंडियन नाश्ता बनवणारा कूक ४.अकाउंटंट २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा- (व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५.**
- **शिवानी पेट शॉप, अलिबाग येथे कामाकरीता मुलगी पाहिजे (कमीतकमी १२ वी पास) संपर्क : ९२७२३८३४७६/९८६०६५८४९६**
- **अलिबागपासून सुमारे दहा किलोमीटरवर वढाव (खुर्द) येथे गावठाणनजीक ३० गुंठे शेतजमीन बोअरवेल, मीटर व घरपरवानगीसहीत विकणे आहे. संपर्क : ७२७६५९१३०२**
- **साईश्रद्धा फाऊंडेशनच्या अलिबाग येथील ऑफिससाठी अॅबॅकस शिकवण्यासाठी शिक्षक पाहिजे तसेच अकाऊंटंट कम क्लार्क पाहिजे. तसेच म्युच्युअल फंड व शेअर मार्केटसाठी सेल्स पर्सन पाहिजेत. आपला बायोडाटा ८३९०९०९४७० किंवा ८१६९६०४५७५ वर वॉटसअप करा.**
- **इलेक्ट्रिकल (वायरींग) कामासाठी गरजू (हेल्पर) मुले हवी आहेत. चेंढरे-गोंधळपाडा ९२७०६१४०७७**
- **फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही असे दोन 2BHK फ्लॅट्स त्वरीत विकणे आहेत. किंमत- ७३ लाख आणि ८३ लाख. संपर्क : ८६९८६८२१२१ (एजंट क्षमस्व)**
- **घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८ ते ६ संपर्क - ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# भिलजी येथे रक्तदान शिबीर

**। भिलजी । वार्ताहर ।**
संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्यावतीने संत निरंकारी भवन भिलजी या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये ८० निरंकारी भक्तांनी निस्वार्थ भावनेने रक्तदान केले. निरंकारी भक्तांबरोबर अनेक सज्जनांनीही या रक्तदान शिबिरामध्ये भाग घेतला. जिल्हा शासकीय रक्तपेढी अलिबाग यांनी रक्तसंकलन केले. या रक्तदान शिबीराचे उद्घाटन प्रवीण पाटील समवेत देवानंद पाटील यांनी केले. यावेळी रक्तपेढी संक्रमण अधिकारी डॉ. शीतल स्वामी तसेच भिलजी गावातील ग्रामस्थ व अनेक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी या शिबिरास सदिच्छा भेट दिली.

# डंपरची वाहतूक ग्रामस्थांच्या जीवावर

## बायपासने वाहतूक वळविण्याची मागणी

***। कोर्लई । वार्ताहर ।***
***मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील समुद्र किनारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या माध्यमातून ठेकेदार डी.व्ही पवार इन्फ्रास्ट्रक्चर यांनी घेतलेल्या सुमारे १२० कोटींच्या जेट्टीचे बांधकाम युद्ध पातळीवर सुरू आहे. या बांधकामासाठी वापरण्यात येणारे दगड नजिकच्याच खारमजगाव येथील खाणीवरुन डंपरद्वारे आणले जात आहे. या डंपरची नांदगावच्या भर बाजारपेठेतून होत असलेली वाहतूक येथील ग्रामस्थांच्या जीवावर बेतत असल्याने ती नजिकच्याच भातशेतीतून काढण्यात आलेल्या बायपास रस्त्याने करण्यात यावी, अशी मागणी नांदगावच्या ग्रामस्थांनी मुरुडच्या तहसीलदारांना केली आहे.***



*मजगाव ग्रामपंचायत हद्दीतील खारमजगाव परिसरातील एका दगड खाणीतून बी ग्रुप, आकाश ट्रान्सपोर्ट आदी वाहतूक ठेकेदारांचे शेकडो डंपर दररोज नांदगावच्या भर बाजारपेठेतून दिवसभर सातत्याने बिनदिक्कतपणे वाहतूक करीत आहेत. जवळपास पंधरा ते वीस टन वजनाचे हे डंपर बाजारपेठेतील वळणावर वाहतूक कोंडी करीत आहेत. शिवाय त्यांचे चालक जास्त खेपा पडाव्यात म्हणून बेदरकारपणे भरधाव वेगात डंपर चालवत आहेत.*



*विशेष म्हणजे या डंपरच्यामागील बाजूस असलेला वाहन क्रमांक नाही, तसेच त्यांना पाठीमागे असलेली लाल लाईट नाही. मंगळवारी यातील एका डंपरचा फाळका भर नाक्यावर तुटून लोंबकळत असतांना एक रिक्षा चालक व एक ग्रामस्थ अक्षरशः जीवघेण्या अपघातातून वाचले आहेत. तसेच, अनेक वाहन चालक व येथील पादचाऱ्यांना त्यांचा नाहक त्रास होत असून ही वाहतूक त्यांच्या जीवावर बेतत आहे.*

*हे डंपर यापूर्वी येथील सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याचे बांधकाम सुरू असताना नजिकच्याच शेतीतून काढण्यात आलेल्या बायपास रस्त्याने ये-जा करीत होते. रस्त्याचे काम पूर्ण होऊन पंधरा दिवस झाले असताना मोठ्या वजनाच्या या डंपरची वाहतूक या रस्त्यावरुन करण्यास कशी परवानगी सा.बां. विभागाने दिली, असा सवाल येथील नागरिकांनी केला आहे. अन्यथा पावसाळी हंगामापूर्वीच हा रस्ता फुटण्यास वेळ लागणार नाही. तरी, मुरुड तहसीलदारांनी याकडे वेळीच लक्ष देण्याची मागणी नांदगावच्या सरपंच व ग्रामस्थांनी केली आहे.*

# ग्राम शिक्षा केंद्राचे उद्‌घाटन

। उरण । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात सावरखार गावात ग्राम शिक्षा केंद्राचे उद्‌घाटन बुधवारी (दि. २१) करण्यात आले. मुलांना शाळेच्या व्यतिरिक्त वेळात वाचनाची आवड निर्माण व्हावी याकरिता प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन संस्थेची संकल्पना सत्यात उतरवण्याचे काम सावरखार गावातील सर्व लीडर माता आणि शिक्षक यांच्या सहकार्याने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या ग्राम शिक्षा केंद्र उभारण्याच्या कार्यक्रमाकरिता गावात ग्रंथदिंडी काढण्यात आली. तसेच उरण प्रथम टीम लीडर रणिता ठाकूर यांनी ग्राम शिक्षा केंद्र या संकल्पनेची माहिती दिली.

कार्यक्रमास अंकुश घरत, मनीषा ठाकूर, प्रतिभा तायडे, शुभांगी म्हात्रे, शरयू प्रवीण घरत, गावातील पालक वर्ग शिक्षणप्रेमी, संपूर्ण उरण प्रथम टीम उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक महेश



गावंड यांनी केले, तर सोनाली म्हात्रे यांनी आभार व्यक्त केले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# कलश इन्टरमेंटतर्फे नारी सन्मान

। उरण । वार्ताहर ।

महिला दिनाचे औचित्य साधून श्लोक पाटील व कल्पना सुर्वे यांच्या संकल्पनेतून त्यांनी साकारलेल्या कलश इन्टरमेंटतर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्कारांचे वितरण जल्लोषात करण्यात आले. उरणमधील सिल्वर ओक ट्रॉपिकल रिसॉर्ट या ठिकाणी हा पुरस्कार वितरणाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मराठी अभिनेत्री भार्गवी चिरमुले, शैलजा घरत, भावना घाणेकर, सायली म्हात्रे उपस्थित होत्या. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या एकूण २३ महिलांना या मंगल कलशाचे सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमानिमित्त विविध डान्स ग्रुपने नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक शेट्टी यांनी केले, तर श्लोक पाटील यांनी आभार मानले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000030530** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-6/2023-2024.** RFx E-tender for Hiring of vehicle at EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025 **….2nd call. Tender amount Rs. 5,99,928/-, EMD amount Rs. 5,999/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **20.03.2024, 18:00 Hrs. to 27.03.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 27.03.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **28.03.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000030407** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-73/2023 - 2024.** RFx e-tender for AMC for Repair/Service/Overhauling/ Problem attending of Compressor of 245/145 kV Circuit Breaker at various substation under EHV (O&M) Division Panvel….**2nd call. Tender amount Rs. 10,00,000/-, EMD amount Rs. 10,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **20.03.2024, 18:00 Hrs. to 27.03.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 27.03.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **28.03.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.६१/२०२४

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री.तुकाराम बाबूराव कोळी
वय : ४६ वर्षे, धंदाः मोलमजूरी — अर्जदार
रा.आदिवासीवाडी, मु.कालवण,
पो.विघवली, ता.माणगाव, जि.रायगड

विरूद्ध

१.निबंधक जन्म-मृत्यू व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत पाणसई,
ता.माणगाव, जि.रायगड — सामनेवाला
२.गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगाव, जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदर अर्जदार श्री. तुकाराम बाबूराव कोळी यांचे वडील कै. बाबूराव बाजी कोळी हे दि. ०७/१०/१९९१ रोजी मौजे मुठवली तर्फे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०९/०१/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे वडील कै.बाबूराव बाजी कोळी हे दि. ०७/१०/१९९१ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री.तुकाराम बाबूराव कोळी यांचे वडील कै.बाबूराव बाजी कोळी हे दि. ०७/१०/१९९१ रोजी मौजे मुठवली तर्फे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव:
ता.: २०/०३/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री. मयुरेश दिनेश पाटकर यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक १.दिपक काशीनाथ पवार २.कामिनी दिपक पवार ३.विनीता जयवंत पवार यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड | ४० | ०.४६.५० | ३.५३ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २१/०३/२०२४

**ॲड. उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस आमचे अशिल १) सौ.रंजीता वैभव पिंगळे, रा.मु.पो.कुर्डूस, ता.अलिबाग, जि.रायगड २) नंदादिप पांडुरंग वशेणीकर पत्ता : चिरनेर ता.उरण, जि.रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणे :

आमचे अशिलांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकी, ताबे कब्जा, वहिवाट व कसवणूकीत जमिन मिळकती मौजे-चिरनेर, ता.उरण जि.रायगड येथे आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे नंबर / गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | चिरनेर, ता.उरण | ७४/२ | ०-२५-५० | ६.३७ |
| २ | चिरनेर, ता.उरण | ७४/३ | ०-३५-९० | ८.९४ |
| ३ | चिरनेर, ता.उरण | ७५/१ | ०-२४-०० | ०.८७ |
| ४ | चिरनेर, ता.उरण | ७५/१७ | ०-१८-०० | ०.६२ |
| ५ | चिरनेर, ता.उरण | ८०/५ | ०-१२-२० | २.६४ |
| ६ | चिरनेर, ता.उरण | ८०/७ | ०-११-१० | २.३७ |
| ७ | चिरनेर, ता.उरण | ८१/१४ | ०-०१-०० | ०.०४ |
| ८ | चिरनेर, ता.उरण | ८१/१६ | ०-०३-०० | ०.०९ |

वर वर्णन केलेल्या मिळकती या आमचे अशिलांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकी, ताबे, कब्जा, वहिवाट व कसवणूकीत आहेत. सदर मिळकतींचे ७/१२ सदरी आमचे अशिलांचे नावाची नोंद नाही. या गोष्टीचा फायदा घेवून आमचे अशिलांचे अपरोक्ष वर वर्णन केलेल्या काही मिळकतींचा त्रयस्त इसमांशी विक्रीव्यवहार करणार असल्याचे व तशा संदर्भात बोलणी चालू असल्याचे आमचे अशिलांस समजले आहे.

तरी वर नमूद मिळकती संदर्भात आमचे अशिलांची लेखी पूर्व परवानगी घेतल्याशिवाय कोणीही कोणताही करार अगर व्यवहार करू नये. सदर करारास व व्यवहारास आमच्या अशिलांची कडक हरकत आहे. वर नमूद मिळकती संदर्भात आमच्या अशिलांच्या अपरोक्ष व पूर्व परवानगी शिवाय कोणताही व्यवहार अगर करार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. त्याचप्रमाणे असा कोणताही करार अगर व्यवहार केल्यास संबंधित इसमांवर आमचे अशिल दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई करतील. हे तमाम जनतेस कळावे.

अलिबाग — सही/-
ता.२१/०३/२०२४

**ॲड.राजीव नथुराम शेरमकर**
'समर्थ' को. ऑप. हौ सोसायटी,
पहिला मजला, रोहिदास नगर, चेंढरे
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय

शुक्रतारा बिल्डींग, तळमजला, कामतआळी, सतक्रार प्रेससमोर, ता.अलिबाग
जि.रायगड दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र.०२१४१-२२२०१३
ई-मेल ddr_rgd@rediffimail.com

जा.क्र.जिउनि/कात-१०/हेरंब.हौ.अलिबाग/२०२४/६९० — दिनांक : २०/०३/२०२४

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३)अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड यांनी गैरअर्जदार मे.चांदोले ॲन्ड असोसिएटस तर्फे भागीदार १.१ श्री मधुकर अंबादास चंदोले १.२ राजेश मधुकर चंदोले १.३ श्री निलेश मधुकर चंदोले, जोशी वाडा, टिळक रोड, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड यांचेविरूद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

नगर भूमापन क्रमांक ८०४/अे-१ क्षेत्र २०९.८७ चौ.मी., ८०४/अे-२ क्षेत्र २७.५९ चौ.मी., ८०४/बी क्षेत्र १०.०० चौ.मी., ८०४/सी क्षेत्र १२५.४० चौ.मी., ८०४/के/अे क्षेत्र ९५.३० चौ.मी., ८०४/के/बी क्षेत्र ६१.०० चौ.मी., ८०४/अे/३ क्षेत्र ९०.३० चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस बजावणी झाली आहे. परंतु सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत. सबब अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व गैरअर्जदार यांना या नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, सदर मिळकतीचे अर्जदारास अभिहस्तांतरण करून देणे संबंधीचे त्यांचे म्हणणे दिनांक ०४.०४.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग — सही/-
दिनांक : २०/०३/२०२४ — **(प्र.का.जगताप)**

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. ६२/२०२४

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात**

श्रीम. सुनिता सुरेश पवार
वय ३३ वर्षे, धंदा गृहिणी — अर्जदार
रा. मु.पो. महागाव,
ता. तळा, जि. रायगड

विरुद्ध

१.निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत पाणसई, — सामनेवाला
ता. माणगाव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगाव, जि. रायगड,

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. सुनिता सुरेश पवार यांचे वडील कै. शांताराम बाजी कोळी ही दि. ०७/०५/१९८५ रोजी मौजे मुठवली तर्फे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड, येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०९/०१/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे वडील कै. शांताराम बाजी कोळी हे दि. ०७/०५/१९८५ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. सुनिता सुरेश पवार यांचे वडील कै. शांताराम बाजी कोळी ही दि. ०७/०५/१९८५ रोजी मौजे मुठवली तर्फे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव :
ता.: २०/०३/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. ६०/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. रवि महिपत मुकणे
वयः २९ वर्षे, धंदा : मोलमजूरी — अर्जदार
रा. पाणसई, पो. तळाशेत,
ता. माणगाव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत पाणसई,
ता. माणगाव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगाव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. रवि महिपत मुकणे यांची आई कै. कली महिपत मुकणे ही दि. ०८/०३/२०१२ रोजी मौजे मुठवली तर्फे निजामपूर, ता. माणगाव जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०९/०१/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई कै. कली महिपत मुकणे ही दि. ०८/०३/२०१२ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. रवि महिपत मुकणे यांची आई कै. कली महिपत मुकणे ही दि. ०८/०३/२०१२ रोजी मौजे मुठवली तर्फे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव :
ता.:२०/०३/२०२४

**कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री.विक्रांत विरेन्द्र कुमार अग्रवाल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री.अथर्व संजय उगले व प्रणित चांगदेव कातकडे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड | १३/१/अ | ०.२७.०० | २.०३ |
| | १७/४ | ०.३५.४० | २.६६ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २१/०३/२०२४

**ॲड. उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात.**

निशाणी नं.
दिवाणी चौकशी अर्ज क्र. ९८/२०२२
नि. १७/ड

१) आशिष नवनाथ भोईटे वगैरे .. अर्जदार

विरूध्द,

शोभा शंकर भोईटे. .. सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ व २ यांचे वडिल व अर्जदार क्र. ३ यांचे पती कै. नवनाथ शंकर भोईटे हे दिनांक १७/०५/२०२१ रोजी त्यांचे रहाते घरी मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. विविध सरकारी कार्यालयामध्ये सरकारी कामकाजाचेवेळी मयताचा वारसा दाखला मागितला जात असल्याने अर्जदार नं. १ व २ यांचे वडिल व अर्जदार क्र. ३ यांचे पती कै. नवनाथ शंकर भोईटे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळावे म्हणून अर्जदार यांनी कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना अर्जदार क्र. १ व २ यांचे वडिल व अर्जदार क्र. ३ यांचे पती कै. नवनाथ शंकर भोईटे यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तींची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दिनांक २६/०३/२०२३ पर्यंत स्वतंत्र किंवा त्यांचे वकीलांमार्फत सदरचे अर्जाकामी कोर्टामध्ये हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै. नवनाथ शंकर भोईटे यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांस येवून मे. कोर्टाकडून योग्य ते पुढील आदेश होतील.

आज दिनांक ११/०३/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही /- — सही/-
**कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधिश क. स्तर अलिबाग.** — **अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे-बेलवडे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीनीचे एकुण क्षेत्रफळापैकी श्रीमती. सरोज महेंद्र बाफणा यांच्या मालकी हक्काचे खाली नमुद क्षेत्र आमचे आशिलांनी त्यांचेकडून कायम खरेदीखतान्वये खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे-बेलवडे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड**

| जमीन मालकांचे नांव | गट/हिस्सा नं. | भूधारणा पध्दती | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| सरोज महेंद्र बाफणा | २२१/१ | भोगवटादार वर्ग-१ | १-४०-९० | ११=९४ |
| पैकी खरेदी देणार यांच्या मालकीचे अविभक्त क्षेत्र | | | ०-४०-०० | ३=४० |

सदरहू मिळकतीत कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्तखत, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंन्डन्स नोटीस, मा.दिवाणी न्यायालयाचे जैसे-थे हुकूम अथवा मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर दिवाणी न्यायालयाने अंतिम न्याय निर्णय अथवा हुकूमनामा पारित केलेला असल्यास, कोणत्याही महसूली न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यास अथवा महसूली न्यायालयाचे मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर अंतिम न्याय - निर्णय पारित केलेले असल्यास अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आंत योग्य त्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजाविरहित आहे आणि सदरहू मिळकतीतील विक्री करणार यांचे मालकी हक्क स्वच्छ व विक्री योग्य आहेत, असे गृहित धरुन, आमचे अशील सदरहू मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारांत घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल — सही / -
दिनांक : २१/०३/२०२४

**श्री. जगदीश एन. उरणकर**
ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफिस :- १०१, आदीत्यप्रज्ञा को.ऑप.हौ.सो.गोखले
हॉल शेजारी, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे ढवर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक शर्मिला विलास मोघे, रा. सहाणगोठी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| ढवर ता. अलिबाग | २९१/३ | | २-५६-८८ | २५.६८ |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून ०७ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०३/२०२४ — सही /

**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर
ता. अलिबाग, जि. रायगड

अशिलाची सही.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार श्री. विनोद शंकर कराळे आणि श्री. दशरथ गंगाराम दळवी यांनी मौजे. धामोते, ता, कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे मालक श्री. जितेंद्र विठ्ठल पेरणे आणि श्री.अर्जुन विठ्ठल पेरणे यांच्या सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १२८ | २१ | २१०-०० | २१-०० |
| १२८ | २२ | २१२-०० | २१-२० |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०३/२०२४

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ
कृपा हौसिंग सोसायटी नेरळ,
महेश टॉकीज जवळ, नेरळ
ता, कर्जत, जि. रायगड
पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. संदिप दयाराम तायवाडे, रा. श्री गणपती कृपा, फ्लॅट नं. ०२, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, नवी मुंबई, पनवेल, रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे बार्डी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत -

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८/१ | १.०८.५० पो.ख. ०.१३.७० | ४.०६ | श्री.दशरथ काशिनाथ कांबरी, वैगेरे एकूण ४ |
| | एकूण १.२२.२० | | |

यापैकी विक्री केलेले क्षेत्र ०.२०.०० हे.आर. पॉ.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २१/०३/२०२४ — सही /-

**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, "पुष्प विमल" निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६.

**निवडक**

## लाजिरवाणे विक्रम

**नवी दिल्ली :** आयपीएलच्या इतिहासात सलग सर्वाधिक सामने गमावण्याचा लाजिरवाणा विक्रम दिल्ली कॅपिटल्स आणि पुणे वॉरियर्स इंडियाच्या नावावर आहे. आयपीएल २०१४ हंगामात दिल्ली कॅपिटल्सने ११ सामने गमावले होते. तर २०१२ पुणे वॉरियर्स इंडिया संघाने सलग ११ सामने पराभवाचा सामना केला होता. यानंतर पुणे वॉरियर्स इंडियाही या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे. आयपीएल २०१३ च्या मोसमात पुणे वॉरियर्स इंडियाला सलग ९ पराभवांचा सामना करावा लागला होता.

## ‘सरफराज’ आयपीएलमध्ये वर्णी

**मुंबई :** आयपीएल २०२४ च्या लिलावात सरफराज खानवर कोणत्याही संघाने बोली लावलेली नव्हती. तो आयपीएल २०२४ च्या लिलावाक अनसोल्ड राहिला. सरफराज मुंबई इंडियन्समध्ये सहभागी होऊ शकतो. गरज भासली तर सरफराज मुंबईच्या ताफ्यात दाखल होऊ शकतो. तो सूर्याची जागा घेऊ शकतो. मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहितने सरफराजची शिफारस संघ व्यवस्थापनाकडे केली आहे. त्यामुळे सूर्यकुमारच्या अनुपस्थितीत तो मुंबई इंडियन्सच्या संघात सहभागी होऊ शकतो.

## राहूल खेळण्यासाठी तंदूरुस्त

**नवी दिल्ली:** भारतीय क्रिकेट संघाचा अनुभव फलंदाज आणि विकेटकिपर राहुलला राष्ट्रीय क्रिकेट अकादमीकडून आयपीएलच्या या हंगामामध्ये लखनौ सुपर जायंट्सकडून खेळण्याची परवानगी मिळाली आहे. राहूल हा लखनौ संघाचा कर्णधार आहे. केएल राहुल इंग्लंड विरोधात हैदराबादमध्ये झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात जखमी झाला होता. तो दुखापतीमधून सावरल्यानंतर त्याला आयपीएलमध्ये खेळण्याची परवानगी मिळाली आहे. मात्र तो खेळणार असला तरी त्याला यष्टिरक्षण करता येणार नाही.

## सिद्धू क्रिकेटच्या मैदानावर

**मुंबई :** राजकारणामुळे क्रिकेटपासून दूर गेलेले माजी क्रिकेटर आणि समालोचक नवज्योत सिंग सिद्धू पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात परतले आहेत. आयपीएलमध्ये ते पुन्हा एकदा समालोचन करताना दिसणार आहेत. आपला वेगळा अंदाज आणि शायरी यामुळे क्रिकेचाहत्यांना त्यांचं समालोचन फार भावतं. दरम्यान टी-२० मुळे फक्त भारतच नाही तर अनेक संघांना आगामी टी-२० वर्ल्डकपसाठी संघ निवडताना मदत होणार आहे असे नवज्योत सिंग सिद्धू म्हणाला आहे.

## महाराष्ट्रात उपउपांत्य फेरीत

**मुंबई :** महाराष्ट्राच्या मुलांनी बिहार मोतीहारी येथे सुरू असलेल्या ३३व्या किशोर गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेची उपउपांत्य फेरी गाठली. उपउपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राने हिमाचल प्रदेशचा ५२-३४ असा पराभव केला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत गुण घेण्याचा सपाटा लावला. यात महाराष्ट्र पहिल्यापासून आघाडीवर होते. पहिल्या सत्राचा खेळ थांबला तेव्हा २८-१८ अशी आघाडी होती. दुसऱ्या सत्रात महाराष्ट्राने आपला खेळ गतिमान करीत गुणांचे अर्धशतक पार केले.

# यंदाची आयपीएल होणार रंगतदार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या सतराव्या हंगामाला २२ मार्चपासून सुरुवात होणार आहे. आयपीएलचे जेतेपद पटकवण्यासाठी १० संघांमध्ये लढत होणार आहे. मोहम्मद शमीसारखा प्रतिभावान गोलंदाज आणि जेसन रॉयसारखा स्फोटक फलंदाज यासह अनेक खेळाडू यावेळेस विविध कारणांमुळे आयपीएलमध्ये खेळणार नसले तरी काही नवीन नियमांमुळे २०२४ मध्ये होणारी ही स्पर्धा विशेष होणार आहे.

आयपीएल २०२४ मध्ये आणखी एक नवीन नियम असा असेल की आता ‘डीआरएस’ ऐवजी ‘स्मार्ट रिव्ह्यू’ सिस्टीम वापरली जाईल. आता मैदानात ८ हॉक-आय कॅमेरे बसवले जातील, जे अधिक अचूक निर्णय घेण्यास मदत करतील. आता टीव्ही अंपायर त्याच खोलीत बसणार आहे जिथे दोन ‘हॉक-आय’ ऑपरेटर बसलेले असतील. आतापर्यंत टीव्ही ब्रॉडकास्टिंग डायरेक्टर टीव्ही अम्पायर आणि हॉक-आय ऑपरेटर यांच्यातील संपर्क म्हणून काम करत असतात. परंतु, आता हॉक-आय कॅमेऱ्यातून काढलेली छायाचित्रे केवळ टीव्ही अंपायरसमोर सादर केली जाणार आहे. स्मार्ट रिप्ले सिस्टीम टीव्ही अंपायरला स्प्लिट-स्क्रीन प्रतिमांसह अधिक व्हिज्युअल्सचा संदर्भ देण्याची परवानगी देईल. सीमारेषेवरील पहिल्या क्षेत्ररक्षकाने हवेत घेतलेल्या रिले कॅचचे उदाहरणासह सांगता येईल, पूर्वी प्रसारक बॉल पकडल्याच्या अचूक क्षणी क्षेत्ररक्षकाच्या पाय आणि हातांची स्प्लिट स्क्रीन एकाच वेळी दाखवू शकत नव्हते. नवीन प्रणाली अंतर्गत, या दोन्ही फुटेजसह स्प्लिट स्क्रीन अंपायरला जेव्हा चेंडू पकडला गेला किंवा सोडला गेला तेव्हा दाखवू शकतो.




### २२ मार्चला पहिला सामना

**२२ मार्चला आयपीएलच्या नव्या हंगामातील पहिली लढत होणार आहे. गेल्या वर्षी विजेते चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात पहिली लढत होणार आहे. याचपार्श्वभूमीवर भारतीय संघाचा आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा फलंदाज विराट कोहली देखील संघाच्या ताफ्यात दाखल झाला आहे.**

### नवीन नियम येणार; गोलंदाज अंपायरला फायदा

**आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळल्या जाणाऱ्या २० सामन्यात एक गोलंदाज एका षटकांत फक्त एक बाउन्सर टाकू शकतो. आतापर्यंत आयपीएलमध्येही असे होत होते, परंतु २०२४ च्या हंगामात हा नियम बदलण्यात आला आहे. आता गोलंदाज एका षटकात २ बाऊन्सर चेंडू टाकू शकतील. यापूर्वी, हा नियम भारताच्या टी-२० देशांतर्गत स्पर्धा, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये वापरला गेला आहे. याचा गोलंदाजांना फायदा होणार आहे.**



# मुंबई इंडियन्सला मोठा झटका

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएल १७ व्या मोसमाचं काउंटडाऊन सुरु झाले आहे. लोकप्रिय क्रिकेट स्पर्धेला १०० तासांपेक्षा कमी वेळ शिल्लक आहे. यंदाच्या हंगामाला २२ मार्चपासून सुरुवात होत आहे. पहिल्या सामन्यात गतविजेता चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात होणार आहे.

मुंबई इंडियन्स पहिल्या सामन्यात २४ मार्च रोजी गुजरात टायटन्स विरुद्ध भिडणार आहे. हार्दिक पंड्या मुंबई इंडियन्संच नेतृत्व करणार आहे. त्याआधी मुंबईच्या गोटातून वाईट बातमी समोर आली आहे.

सूर्यकुमार याने मुंबईला मोठा झटका दिला आहे. दुखापतग्रस्त सूर्यकुमारला आयपीएलच्या सुरुवातीच्या काही सामन्यांना मुकावं लागू शकते.

इतकंच नाही, तर सूर्याकुमारवर आयपीएलमधून बाहेर पडण्याचा धोका आहे.

### सूर्यकुमार यादव आयपीएलमधून बाहेर?

सूर्यकुमार याची बंगळुरुतील एनसीएमध्ये फिटनेस टेस्ट पार पडली. मात्र, सूर्याला एनसीएकडून हिरवा कंदील मिळाला नाही. क्रिकेटर दुखापतीनंतर एनसीए अर्थात नॅशनल क्रिकेच एकेडमीमध्ये दुखापतीतून फिट होण्यासाठी जातात. तिथे खेळाडूंवर तज्ञांकडून देखरेख ठेवली जाते. त्यानंतर त्यांना टेस्ट द्यावी लागते. त्या टेस्टमध्ये पास झाल्यानंतर एनसीए तो खेळाडू फिट असल्याचं जाहीर करते. त्यानुसार १९ मार्च रोजी टेस्ट होती. मात्र, यामध्ये सूर्याला एनसीएकडून हिरवा कंदील मिळालेला नाही. त्यामुळे सूर्याला १७ व्या हंगामातील काही सामन्यांना मुकावे लागू शकते.



# श्रीलंकेच्या खेळाडूंवर कारवाई

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रीलंकेच्या दोन खेळाडूंवर आयसीसीकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. यामधील एका खेळाडूला काही सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे. श्रीलंका क्रिकेट संघातील अष्टपैलू खेळाडू वानिंदू हसरंगाने गतवर्षी १५ ऑगस्टला कसोटी क्रिकेटमधून संन्यास जाहीर केला होता. पण नंतर त्याने आपला निर्णय माघारी घेतला होता.

बांगलादेशविरोधातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत त्याला समाविष्ट करुन घेतले होते. २२ मार्चपासून ही मालिका सुरु होणार आहे. पण त्याआधीच आयसीसीने हसरंगानेवर कारवाई केली आहे. यामुळे तो आगामी मालिकेत खेळू शकणार नाही.



### हसरंगावर कारवाई

**हसरंगाने कसोटी मालिकेआधी बांगलादेशविरोधातील एकदिवसीय मालिका खेळली. या मालिकेतील तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात त्याने आयसीसीच्या नियमाचे उल्लंघन केले. यावेळी हसरंगाने अम्पायरकडून टोपी खेचून घेतली आणि त्यांची खिल्ली उडवली होती.**

### कुसलवर कारवाई

**श्रीलंकेचा कर्णधार कुसल मेंडिसवरही कारवाई करण्यात आली आहे. तिसऱ्या सामन्याच्या शेवटी अम्पायरशी हात मिळवत असताना गैरवर्तन केल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली. ५० टक्के दंड आणि तीन डिमेरिट गुणांसह ही कारवाई करण्यात आली. आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान खेळाडू, पंच किंवा सामनाधिकारी यांच्या वैयक्तिक गैरवर्तनाशी संबंधित आहे. हसरंगा आणि मेंडिस या दोघांनीही आपली चूक मान्य केली आहे.**

# वसंत ढवण यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राचे ज्येष्ठ राष्ट्रीय कबड्डी खेळाडू वसंत ढवण यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, मुलगी, सूना व नातवंडे असा परिवार आहे. अमृतसर येथे १९६१ साली झालेल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत ते प्रथम महाराष्ट्राकडून खेळले. त्यानंतर जबलपूर (१९६२), अलाहाबाद (१९६३), कोल्हापूर (१९६४), हैद्राबाद (१९६५), बडोदे (१९६६) अशा सलग सहा स्पर्धेत ते महाराष्ट्राकडून खेळले. पण त्यांना महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी १९७० साली लाभले. ते अष्टपैलू खेळाडू होते. उजवी चढाई करणारे ढवण हाताने चांगल्या प्रकारे गडी टिपत.



विरार येथे ढवण यांनी श्रीरामकबड्डीसंघाचीस्थापना केली होती. त्यासंघाचा महाराष्ट्रात दबदबा आजही आहे. मुंबईच्या ओम् कबड्डी प्रबोधिनीचे त्यांना जेष्ठ कबड्डी खेळाडू म्हणून सन्मानित केले होते. त्यानंतर महाराष्ट्रातील छत्रपती पुरस्कार प्राप्त संघटनेने पहिल्याच वर्षी त्यांना ‘कबड्डी योद्धश’ हा पुरस्कार शरदचंद्र पवार यांच्या हस्ते देऊन त्यांचा यथोचित गौरव केला होता.

विरार येथील विराट मैदानाच्या बाजूला असलेल्या हिंदू स्मशान भूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# हिमांशू तलान नेमबाजीत अव्वल

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आर्मी मार्कमनशिप युनिटच्या हिमांशू तलान याने लक्ष्य करंडक नेमबाजी स्पर्धेत सीनियर गटाचे विजेतेपद मिळवले. ही स्पर्धा पनवेल येथील कर्नाळा स्पोर्टस अकादमी येथे पार पडली. तलान याने २५१.२ गुण मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले. त्याने विजेतेपद मिळवताना महाराष्ट्राच्या मोहित गोवडा (२४९.०) याला मागे टाकले. अंतिम शर्यतीत तलानची सुरुवात फार सावध होती. तो पहिल्या पाच शॉटमध्ये अव्वल तिघांमध्येही नव्हता. मात्र, पाच सेटच्या दुसऱ्या शॉटमध्ये त्याने दुसऱ्या क्रमांकावर मुसंडी मारली. पहिल्या एलिमिनेशन राऊंडमध्ये पहिले स्थान मिळवले.

# पंकज अडवाणीला यश

### आणखी एक मानाचा तुरा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा दिग्गज बिलियर्ड खेळाडू पंकज अडवाणीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्याचा समावेश चीनमधील शांगराव शहरातील वर्ल्ड बिलियर्ड्स संग्रहालयातील हॉल ऑफ फेममध्ये करण्यात आला आहे. पंकज अडवाणीने आत्तापर्यंत मोठे यश मिळवले आहे. त्याने गेल्याचवर्षी नोव्हेंबरमध्ये विक्रमी २६ व्यांदा आयबीएसएफ वर्ल्ड बिलियर्ड्स चॅम्पियनशीपचे विजेतेपद जिंकले होते. त्याने नोव्हेंबरमध्ये बिलियर्सच्या या लाँग फॉरमॅटच्या स्पर्धेतील अंतिम सामन्यात भारताच्याच सौरव कोठारीला पराभूत केले होते. यासह ९व्यांदा बिलियर्सच्या या लाँग फॉरमॅटचे पंकजने विजेतेपद जिंकले होते.



**वर्ल्ड बिलियर्ड संग्रहालयात हॉल ऑफ फेममध्ये माझा समावेश केल्याबद्दल मला खूप अभिमान वाटत आहे. या अभूतपूर्व प्रवासात मला खूप प्रेम आणि पाठिंबा मिळाला, ज्यासाठी मी खूप आनंदी आणि कृतज्ञ आहे.**
**-पंकज अडवाणी**

## वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा २०२४

# अहमदनगरचे वाडिया पार्क सज्ज

### महाराष्ट्राच्या कामगिरीकडे कबड्डीप्रेमींचे लक्ष

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।**

७०व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धा २१ ते २४ मार्च या चार दिवसात नगरच्या वाडिया पार्क क्रीडा संकुलात वरिष्ठ पुरुष गट कबड्डीचा थरार रंगेल. गतउपविजेत्या महाराष्ट्राच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष असेल. भारतीय कबड्डी महासंघ व महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या मान्यतेने अहमदनगर जिल्हा हौशी कबड्डी फेडरेशनने प्रथमच या स्पर्धेचे आयोजन केले आहे. जिल्हाक्रीडा अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २१) सायंकाळी ५-०० वाजता या स्पर्धेला प्रारंभ होईल. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघाची आठ गटात विभागणी करण्यात येणार असून महाराष्ट्राचा ‘ब’ गटात समावेश केला आहे. प्रत्येक गटातून २ संघ असे एकूण १६ संघ बाद फेरी गाठतील. बाद फेरीच्या सामन्यापासून खऱ्या अर्थाने स्पर्धेत चुरस पहावयास मिळेल.



स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात आली असून मॅटच्या चार क्रीडांगणावर एकाच वेळी सामने पहावयास मिळतील. सामने सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येतील. तीस हजार क्रीडारसिकांना स्पर्धेचा आनंद मनमुराद लुटता यावा याकरिता प्रेक्षक गॅलरी उभारण्याचे काम पूर्ण होत आले आहे. बुधवार पर्यंत २२ संघाचे आगमन नगरमध्ये झाले असून आठ संघ येण्याच्या मार्गावर आहेत. स्पर्धेतील सामने वेळेवर सुरू करून वेळत संपविण्याचा आयोजकांचा मानस आहे.

# भाजी मंडई रिक्षा संघ विजयी

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

महाड तालुका रिक्षा युनियन अंतर्गत आयोजित क्रिकेट स्पर्धा महाडच्या क्रांतिस्तंभ मैदानात आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेचे उदघाटन युनियनचे अध्यक्ष रोहित रवींद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रिक्षा युनियन अंतर्गत आयोजित क्रिकेट स्पर्धेचे हे दुसरे वर्ष होते.

या स्पर्धेत महाड एसटी. स्टॅण्ड नाईट रिक्षा स्टॉप संघ, दस्तुरी नाका रिक्षा स्टॉप संघ, विरेश्वर मंदिर रिक्षा स्टॉप संघ ‘ए’ आणि ‘बी’ संघ, जुना पोस्ट नाका रिक्षा संघ, भाजी मंडई रिक्षा स्टॉप संघ, फौजी अंबावडे रिक्षा स्टॉप संघ, भगवानदास बेकरी रिक्षा स्टॉप संघ, वेलकम रिक्षा स्टॉप संघ, चवदार तळे व राम मंदिर रिक्षा स्टॉप संघ, छत्रपती शिवाजी महाराज चौक रिक्षा स्टॉप संघ आणि नवेनगर रिक्षा स्टॉप संघ अशा बारा संघानी सहभाग नोंदवला. अंतिम सामन्यात भाजी मंडई रिक्षा स्टॉप संघाने विरेश्वर रिक्षा स्टॉप संघाला अटीतटीच्या सामन्यात एका धावेने पराभूत करत दुसऱ्या महाड तालुका रिक्षा युनियन चषकावर आपले नाव कोरले असून विरेश्वर रिक्षा संघ हा उपविजेता ठरला तर तृतीय पारितोषिक छत्रपती शिवाजी महाराज चौक रिक्षा स्टॉप संघाने पटकाविले.



# कॅमेरूनच्या बाईकला अपघात

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

सँडपेपर प्रकरणात अडकलेल्या ऑस्ट्रेलियाचा फलंदाज कॅमेरून बॅनक्रॉफ्ट बाईक अपघाताचा बळी ठरला आहे. या अपघातात कॅमेरून बॅनक्रॉफ्ट गंभीर जखमी झाला आहे. या अपघातानंतर तो शेफिल्ड शील्डच्या अंतिम फेरीत खेळू शकणार नाही. शेफिल्ड शिल्डचा अंतिम सामना वेस्टर्न ऑस्ट्रेलिया आणि तस्मानिया यांच्यात खेळला जाईल, परंतु अपघातानंतर कॅमेरून हा वेस्टर्न ऑस्ट्रेलियन संघाचा भाग असणार नाही. कॅमेरूनच्या अनुपस्थितीत वेस्टर्न ऑस्ट्रेलिया शेफिल्ड शील्ड फायनलमध्ये टास्मानियाविरुद्ध ॲरॉन हार्डीसह मैदानात उतरू शकते.

## आरसीबी संघाचं बदललं नाव

# नव्या जर्सीत विजेतेपदाचं स्वप्न!

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ च्या थराराला सुरुवात होण्यासाठी तीन दिवस बाकी असताना आरसीबी संघाने मोठा निर्णय घेतला आहे. यंदा आरसीबी संघ नव्या जर्सीमध्ये दिसणार असून आता संघाच्या नावातही बदल केला गेला आहे. वुमन्स प्रीमियल लीगमधील आरसीबीने संघाने विजेतेपद जिंकल्यावर फ्रँचायसीने हा निर्णय घेतला आहे. आरसीबी संघाचं नवीन नाव काय आहे याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे. नावात काय बदल केला गेला आहे?

आरसीबी संघांच नवीन नाव हे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू असं करण्यात आले आहे.

सुरूवातीला नेमका काय बदल केला हो कोणाच्या लक्षात नाही आले. आरसीबी संघाच्या नावातील बंगलोरच्या ऐवजी आता बंगळुरू केलं आहे. २०१४ मध्ये बंगलोर शहराच नाव बदलून बंगळुरू असे करण्यात आले होते. मात्र तेव्हा आरसीबीने आपल्या नावात कोणताही बदल केला नव्हता. मात्र आता दहा वर्षांनी आरसीबीनेही नावामध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

आरसीबी संघाने जर्सीमध्येही बदल केला आहे, त्यामुळे नावात आणि जर्सीमध्ये बदल करत आरसीबी संघ कात टाकण्याचा प्रयत्न असणार आहे. आरसीबीला आयपीएलमध्ये एकही विजेतेपद जिंकता आलेले नाही. टीममध्ये अनेक दिग्गज खेळाडू आत-बाहेर झाले, कॅप्टन बदलला पण अजुनही काही यश आले नाही. मात्र यंदा वुमन्स टीमने विजेतेद जिंकल्याने चाहत्यांना आता मेन्स टीमकडूनही विजेतेपदाच्या आशा आहेत. या हंगामामध्ये संघ कशी कामगिरी करतो हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



### वुमन्स प्रीमियल लीग विजेतेपद जिंकल्यावर घेतला निर्णय

# अल्कारेजकडून सलग विजयांची मालिका खंडीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन वेल्स ओपन ही टेनिस स्पर्धा सध्या चालू असून शनिवारी (दि.१६) झालेल्या पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात २० वर्षीय अल्कारेजने इटलीच्या यानिक सिनरला पराभवाचा धक्का दिला.

यासह स्पेनचा अल्कारेज अंतिम सामन्यात पोहचला आहे.उपांत्य सामन्यात अल्कारेजने पहिला सेट अत्यंत वाईटरित्या पराभूत झाल्यानंतरही दणक्यात पुनरागमन केले आणि पुढील दोन्ही सेट जिंकून अंतिम सामन्यातील प्रवेश निश्चित केला.

अल्कारेजने १-६, ६-३, ६-२ अशा फरकाने सिनरला पराभूत केले.

यासह सिनरची सलग १९ विजयांची मालिका खंडीत झाली. त्याचबरोबर २०२४ वर्षात सलग १६ विजयांनंतर सिनर पराभूत झाला आहे. सिनरने २०२४ ऑस्ट्रेलियन ओपनचे विजेतेपदही जानेवारीमध्ये जिंकले होते.

दरम्यान, या विजयामुळे अल्कारेजने क्रमवारीतील दुसरे स्थानही निश्चित केले आहे. तसेच अल्कारेज आणि सिनर हे दोघे आत्तापर्यंत ८ वेळा आमने-सामने आले असून आता प्रत्येकी ४ विजयांसह बरोबरी झाली आहे. सामन्यानंतर अल्कारेजने म्हटले की यासारख्या सामन्यात, जेव्हा एक सेट पराभूत झालेला असताना मानसिकरित्या कणखर राहणे महत्त्वाचे होते. विशेष म्हणजे पहिला सेट चालू असताना पावसामुळे जवळपास ३ तास हा सामना थांबवावा लागला होता.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)